म. ग्रं. सं. ठाणे
काव्य
क्र. १८३७



REFBK-0015569
REFBK-0015569

# उल्हासिका

— उल्हास

७३६३७
२१३।६९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्र०
अनुक्रम ७३६३७ वि: काव्य
क्रमांक १०३७ नोंद दि: २३।७१

# उल्हासिका

( काव्यसंग्रह )

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ७५५६९

कवि : उल्हास

प्रस्तावना : प्रा. चंद्रकुमार डांगे
एम्. ए.; एम्. एड्.

सुखपृष्ठ व चित्रें : श्री. म. वि. सोहोनी

REFBK-0015569
REFBK-0015569

चारुचंद्र प्रकाशन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
ग्रंथालय
संग्रह योजना
१९७०

१९६६ ( द्वितीयावृत्ति )

# परिचय

उल्हास ( नारायण सदाशिव बापट. ) जन्म : १०।११।१७ कोतवडें—



रत्नागिरी. व्यवसाय – लेखन, अध्यापन व प्रचार. इङ्ग्रजींत व मराठींत सामाजिक, साहित्यिक, राजकीय, तात्त्विक आणि संलग्न विषयांवर निबंधरूपांत आणि नियतकालिकांतून लेखरूपांत लेखन केलें आहे. लहानपणापासून कविता रचूं लागले; त्यांतल्या कांहीं नियतकालिकांतून, विशेषतः मासिकांतून, प्रसिद्ध झाल्या आहेत. 'मानवी जीवन आणि बुद्धिवाद', 'नीतिमीमांसा', 'Nationalism versus Communalism', 'A Plea For Regional Socialism' इत्यादि निबंधांचे व 'पहिला बाजीराव' या ऐतिहासिक नाटकाचे लेखक. यांनीं १९३९ पासून १९४५ पर्यंत, गुप्त राजकीय कार्याचा भाग म्हणून, पुष्कळ लिखाण लिहून तें निरनिराळ्या डाव्या राजकीय गटांच्या आणि दे. भ. शिरूभाऊ लिमये, दे. भ. आमदार बचाजी रामचन्द्र राणे अशांसारख्या ज्येष्ठ राजकीय कार्यकर्त्यांच्या सहाय्यानें प्रसृत केलें. 'चालू युद्ध आणि हिंदी क्रांति', 'The Reactionary Policy of the R. D. P. during the S. I, War', 'Our task at Present', 'What must We Do Now ?' या त्यांच्या गाजलेल्या गुप्त पुस्तिका होत. मुंबईहून 'क्रांतियुद्ध' म्हणून गुप्त साप्ताहिक श्री. बापट व त्यांचे सहकारी काढीत त्यांतील ओळन् ओळ बहुधा त्यांनींच लिहिलेली असे. कांहीं वेळां गुप्त वाङ्मय लिहितांना 'किसन बाल' हें टोपण नांव यांनीं घेतलें होतें. सध्यां ते राजकारणांतून निवृत्त आहेत. ते प्रभावी वक्ते म्हणून यशस्वी ठरलेले आहेत. 'रसोल्हास' हा त्यांचा दुसरा काव्यसंग्रहही यथावकाश प्रकाशित होईल. ('रसोल्हास'मधील दोन कविता या काव्यसंग्रहांत घेतल्या आहेत.)

---

प्रकाशक : चारुशील नारायण बापट, ७५९-६१ कर्वे रोड, पुणें ४
मुद्रक : य. गो. जोशी, आनंद मुद्रणालय, १५२३ सदाशिव पेठ, पुणें २
ब्लॉक्स् : व्ही. जोशी अ‍ॅण्ड को. शेवडे बोळ, पुणें २

# प्रस्तावना

१९५२ सालच्या वेळापत्रकाप्रमाणें मी वर्गात गेलों आणि व्याख्यानाचा आरंभ करीतच सर्वत्र नजर टाकली. अगदीं एका टोंकाला, शेवटल्या ओळींत एका बाकावर आपले दोन्ही हाताचे तळवे चेहराभर पसरून, डोळे स्थिर करून, आडव्या बांध्याच्या भरीवपणाची जाणीव सह-अध्यापकांना देत बसलेल्या एका व्यक्तीनं माझं चित्त वेधलं. केवळ स्मित हास्यानंच आम्ही एकमेकांना 'ओळखून' असल्याची जाणीव स्पष्ट केली. पण माझ्या मनांत मात्र चलबिचल झाली. आपलं व्याख्यान आता प्रश्न आणि उपप्रश्न यांनी 'रंगणार' असा विचार प्रबळ होत गेला. पण तसं कांहीं घडलं नाहीं. पुन्हां एकदां मी प्लॅटफॉर्मवरून उतरतांना त्या व्यक्तीकडे पाहिलं. 'हें कसं असं घडलं' असाच अर्थ आम्ही व्यक्त केला. आणि कांहीं वेळानं माझ्या पाठीवर 'स्कॉटलंड यार्ड' पद्धतीनें एक बोट कुणीतरी टेकविलं म्हणून मी वळून पाहातो तों 'सर, माझं जरा काम आहे तुमच्यापाशीं' असें थोडेसं औपचारिक बोलतच ती व्यक्ति जरा दूर गेल्यावर उद्‍गारली; 'अरे तूं इथें असतोस?' मी तोच प्रतिप्रश्न करीत म्हटलें, 'पण आज तूं एकही शंका कशी विचारली नाहींस?' त्यावर आम्ही दोघेही मनःपूर्वक हंसलों. कारण 'शंका' बापट बी. टी. ला आला होता!

इतकंच नव्हे तर एक दिवस अचानक माझ्या हातीं एका मोठ्या पाकिटांत आपल्या निवडक कविता घालून, मला तें पाकीट देतांना श्री. बापट म्हणाले, 'हा माझा काव्यसंग्रह आहे. लवकरच तो प्रकाशित होणार आहे,' मी कांही बोलणार तोंच श्री. बापट दूर निघून चालायला देखील लागले! त्यावरून मला एका प्रसंगाची आठवण झाली. कांहीं वर्षांपूर्वी एक छोटी पुस्तिका माझ्या हातीं देत त्यांनीं म्हटलेलें आठवलं, 'हा माझा थिसिस् आहे. वाचून मत कळव.' आणि त्या निबंधाची (मानवी जीवन आणि बुद्धिवाद) सर्वत्र झालेली प्रशंसा मला स्पष्ट आठवूं लागली. आणि याहीपेक्षां मोठा धक्का त्यांनीं मला कांहीं हस्तलिखितें दाखवून, त्यावरच्या तांबड्या रेघांवरून बोटें फिरवीत काढलेल्या शब्दांनीं दिला. "ह्या खुणा कोणी केल्यात आहे ठाऊक? तात्यासाहेब केळकरच प्रस्तावना लिहिणार होते!" खरोखर

मी सर्द झालों. पुण्यांत कित्येक व्याख्यात्यांना ‘ शंका ’ विचारून आमच्या ‘ टोळीनें ’ इतकें हतबुद्ध कधींच केलं नसेल. त्या आमच्या नायकानं आपल्याच एका साथीदारावर असा उघड, उजेडांत घाव घालावा हें किती विस्मयजनक ! वसंतव्याख्यानमालेचा जर कधीं खराखुरा इतिहास लिहिला गेला तर श्री. बापट आणि माझ्यासारखे त्यांचे साथीदार यांचा उल्लेख अवश्य करावा लागेल. कारण आम्ही ‘ प्रश्न ’ विचारायच्या निर्धारानें प्रत्येक व्याख्यान ऐकत असूं. कुणी काय विचारायचं हें अगदीं ठरलेलें असे. आणि कुणाला कांहींच सुचलें नाहीं तर बापट आपला तयार !

प्रत्यक्ष छापील मुद्रितें वाचण्यापूर्वी माझं मन उल्हासची कविता कोणत्या स्वरूपाची असेल या कल्पनेशीं चाळा करूं लागलं आणि मी एका कल्पनेनं अक्षरशः हादरून गेलों ! ‘ हें नवकाव्य तर नसेल ? ’ हा प्रश्न माझ्या डोक्यांत गरगरूं लागला. कारण नवकाव्यावर लिहायचं म्हणजे त्याला “ भयंकर प्रकृतीचीच’ गरज आहे अशी माझी उपलब्ध नवकाव्य वाचून आणि त्याला ‘ शिवलेल्या ’ ‘ व्यवच्छेदक लक्षणांच्या ’ प्रस्तावना वाचून खात्री झाली होती. नवकाव्याच्या ‘ साथीला ’ आपला एक मित्र बळी पडला कीं काय अशीही दुष्ट शंका आलीच. कारण आजकालची ‘ फॅशन ’ नवकाव्य लिहिण्याची आहे. तरी सुदैवानें एक गोष्ट मोठी आशादायक आहे कीं, ‘ तें नवकाव्य ’ फक्त त्या नवकवींनाच कळतें ! इतर काव्याचे रसिक ‘ त्यांना ’ ‘ अस्पृश्य ’ वाटतात. तशांत नवकाव्याची तरफदारी करणारीं ‘ भोळीं ’ साप्ताहिकें आणि मासिकें या सार्‍यांना ही ‘ लीलममें छाया चीज ’ अभिनव आणि ‘ क्रांतिकारक ’ वाटत असल्यामुळें आपला उल्हास या ‘ फाल्गुनी वाङ्मयाच्या होळीवरचा होळकर बनला ’ कीं काय अशीही धास्ती उत्पन्न झाली. पण या भयानक विचारांच्या आवर्तनांत एक आशेचा किरण होता. तो म्हणजे सत्यकथेंत पूर्वी वाचलेली उल्हासची ‘ निरोपाच्या नजरेंत ’ ही कविता होय. देवीवर छदांतल्या त्या सफाईदार रचलेल्या पंक्ती पुनः जाग्या झाल्या. उल्हास हें नांव सार्थ करणारी ती श्री. बापटांची एक सुंदर कविता आहे.

‘ निरोपाच्या नजरेंत शीतलशा दोन ज्योती
दूर जातां प्रियकरा पाठवणी ओंवाळीती

किंवा

‘ निरोपाच्या नजरेंत
आणि स्मृतीवर तिच्या
अशी करूं देवघेव
मग रमवूं ये जीव ’

यासारख्या आशादायक वृत्तीनं लिहिलेलं उल्हासचं काव्य असेल तर किती बरं होईल, अशी आशाही वाटूं लागली. आणि या छोट्या उल्हासिकेंत समाविष्ट केलेल्या कविता वाचून ती आशा शतगुणित झाली ! आपल्या एका समवयस्क कवीचा संयम, वैचारिक निष्ठा आणि रसरसलेला आशावाद या गुणांनीं नटलेला काव्यसंग्रह रसिकांच्या पुढें मोठ्या शालीनतेनें येत आहे या विचारानं मन उल्हसित झालं !

पण ही उल्हासिका उजळत आहे ती किती प्रतिकूल वातावरणांत ! पण म्हणूनच ती एका अर्थानं वैशिष्ट्यपूर्ण आहे. सुमारें दहा वर्षांपूर्वी ‘ मराठी काव्याला ओहोटी लागली आहे ’ अशी ‘ पुरोगामी आंवई ’ कोणी तरी पिकवली. आणि या अफवेचा पुरा सूड जर कोणी घेतला असेल तर तो नवकवींनीं, म्हणजे त्यांच्या नवकाव्यानं ! पण येथपर्यंतच थांबलें नाहीं तर ‘ जुन्या ’ कवींना व्यासपीठावरून दगड मारण्याचा उपक्रमही जोरांत सुरू झाला. कुठल्या तरी व्यक्तीनं उठावं आणि आपली जुनी जर शेला–पैठणीच्या दिमाखानं चवाठ्यावर विकतांना खुशाल दगडफेंक करावी ! तर साहेबाच्या खांद्यावर बसून टीकाप्रकार सांगणाऱ्या एखाद्या बहाद्दरानं आंकडेवारीच्या आणि पोकळ अनुमानांच्या आधारावर माननीय कवींना खुशाल ‘ पलायनवादी ’ म्हणून शिक्के मारीत सुटावं. ‘ मानवता, ” “ अश्रू ’, ‘ क्रांति ’, ‘ रक्त ’ असल्या स्वस्त शब्दांची खैरात करून कुणाला ‘ उद्यांचा ’ तर कुणाला ‘ परवाचा ’ कवि ठरवावं. तर एखाद्या कालच्या पोरानं, चार अक्षरं जुळविण्याच्या संवयीवर ज्ञानदेवांना ‘ टिप्पणी कां लिहिल्या नाहींत ? ’ असा प्रश्न विचारून ‘ विनोद ’ साधावा ! असा आजचा जमाना आहे. वैयक्तिक बेताल अशा जीवनाच्या नरकांत रममाण होत असतांना जगाला मात्र ‘ आर्थिक समतेचा ’ आणि ‘ क्रांतीचा ’ संदेश सांगणारे ‘भुण-भुणे, ’ ‘ कई ’ म्हणून नुसते मिरवीत नाहींत तर त्यांच्या ‘ मेणाच्या ताटल्या ’ ज्या संख्येनं विकतात त्यावरच काव्याचं श्रेष्ठत्व आणि कवीचं व्यक्तित्व

मापलं जाऊं लागलं आहे. केशवसुत, गडकरी, बालकवि, कुसुमाग्रज, यशवंत तांबे, गिरीश, माधव, यांच्या संपूर्ण कविता न वाचतां देखील त्यांना 'खलास' म्हणून डावलण्याचा आजचा काळ आहे. आपल्या वैयक्तिक चाळ्यांचे चोचले पुरवीत, कळप करून राहणाऱ्या तथाकथित 'कवींचा' हा काळ आहे. त्याच्या जोडीला सर्वत्र भरून येत असलेली 'विफलतेची' भयानक जाणीव ! याची कल्पना उल्हासला नाहीं असं नाहीं. तो म्हणतो,

हा लिलांव बोलत पैंजण नित खुळखुळे
माणुसकी वधिली वारांगण मोकळें
चुरडिती पदतलीं शिवसत्याचे कळे
—मी जातों इथुनी; जग माझें वेगळें'

पण म्हणून या कठोर वस्तुस्थितीपासून उल्हास दूर गेला नाहीं. तर एक अत्यंत वास्तव असा आशावाद उराशीं घट्ट धरून तो झगडत राहिला.

उचलील मृत्यु मग मजला शिणल्यावरी
विस्मृतींत रक्षा उडेल माझी पुरी
जन्मेन कदाचित पुनः मानवांतुनी
नवरूपी उत्स्फूर्तांच्या कृत्यांतुनी

उल्हासची 'उल्हासिका' वैशिष्ट्यपूर्ण आहे असं मी म्हणतों तें यासाठींच.

अर्थातच जगापुढं आपला काव्यसंभार आणतांना उल्हासनं रसिक-वृत्तीला आवाहन केलेलं असलं तर नवल नाहीं. पण तिथेंही एक प्रकारचा पीळ आहे. 'कोठेंही जगतांत या रसिकते ना भासतें अंतर' असा विश्वास प्रकट करून कवि म्हणतो,

अम्हांला निंदकांनो द्या कितीही दूषणें तुम्ही
तयां मानू मिळालेलीं जगींचीं भूषणें नामी

हा पीळ, 'जिद्द' किंवा आत्मविश्वास केवळ स्वतःच्या काव्यापुरताच मर्यादित नाहीं; तर त्याचें प्रतिबिंबच कवितारूपानें अभिव्यक्त झालेलें आहे. 'शिववंश' (आगामी महाकाव्य), 'हे सह्याद्रि,' 'किल्ल्यांत कशाला जाऊं ?' किंवा 'स्वातंत्र्यलक्ष्मीस' या ऐतिहासिक विषयांवर रचलेल्या आणि कवीचें स्फटिकवत् भावनाप्रधान अंतःकरण उघड करून दाखविणाऱ्या

कविता कशाच्या निदर्शक आहेत ? पाश्चात्य आणि पौर्वात्य राजकीय आणि तत्त्वज्ञानात्मक वाङ्मय आकंठ वाचून आणि प्रत्यक्ष राजकीय आखाड्यांत चार हात करूनही श्री. बापट यांच्या व्यक्तिमत्त्वांतील ही सुषमा कशी विलसत राहिली याची संगति जर लावावयाची म्हटली तर त्याला एकच कारण निर्देशित करावं लागेल. आणि तें म्हणजे स्वातंत्र्यवीर तात्याराव सावरकरांच्या विशाल व्यक्तित्वाच्या छायेंत वाढलेला कवि उल्हास ! स्वतःला बुद्धिवादी मानणाऱ्या बापटांनीं, तथाकथित बुद्धिवाद्यांचीं 'अश्रद्ध' वृत्ति स्वतःला चिकटवून घेतली नाहींच; पण आपल्या अंतःकरणांतील '**परीक्षावया स्वहृदींचीं स्पन्दनें**' अशी एक प्रकारची तेजस्वी वृत्ति जागती ठेवली. ही 'अलिप्तता' केवळ 'वाङ्मयीन' नाहीं; तर तिला जीवनधर्मांचा भरभक्कम पाया आहे.

उल्हासच्या सर्व कवितांना संयमाचा आणि प्रामाणिक वृत्तीचा मनोहर परिसर लाभलेला आहे. उल्हासिकेंत मला जो जिवंतपणा वाटतो तो यामुळंच. मराठी वाङ्मयांतील मूलग्राही टीकाकार प्रा. श्री. के. क्षीरसागर यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या काव्याचं मर्म विशद करीत असतांना जें म्हटलं आहे तीच 'प्रवृत्तीपर वृत्ति' ( Love of Life ) आणि 'सौन्दर्य-वादी वृत्ति' उल्हासची पाठीराखी बनून राहिली आहे. इतकंच नव्हे तर, '**साधूनी पुरुषार्थ सर्व उरसीं मोक्षासि आकर्षण**' या पंक्तींनं आपल्या मनांतील भक्तिभाव, स्वातंत्र्यवीरांबद्दल गौरवोद्गार काढतांना त्यानं व्यक्त केला आहे. जीवनांत जें जें भव्य, उदात्त, मंगल आणि क्रान्ति–कारक आहे त्याची मानसपूजा करावयाचा मोह उल्हासला न झाला तरच आश्चर्य ! म्हणूनच सुभाषचंद्राला पाहून तो विनीत होतो आणि सह्याद्रीचं दर्शन घडल्यावर गुणगुणतो.

आज सुदैवानें भारत स्वतंत्र झाला आहे. पण अजूनही त्या स्वातंत्र्याला आपली प्रभा प्रकट करण्याच्या मार्गांत कितीतरी भयानक संकटांना तोंड द्यावं लागत आहे. अज्ञान, निरक्षरता, जातिद्वेष, वैर, स्वार्थ, सत्तान्धता, रूढी, विषमता इत्यादी हजारों काळेकुट्ट ढग त्या स्वातंत्र्यलक्ष्मीच्या तेजाला ग्रहणच लावीत नाहींत काय ? तोपर्यंत उल्हासनं लिहिलेल्या पुढील ओळीं अजूनही एका अर्थानं किती यथार्थ वाटतील.

' परि जाउनियां नुसतेंच
आठवून झालें तेंच
जो शिळालेख तो तोच
एकसारखा वाचुनियां काळ कां दवडिणें वायां ? '

भारताला या नवविश्वांत स्वस्थ बसून कसें चालेल ? या नव्या युगाची जाणीव अधिक तीव्र वाटूनच कीं काय उल्हासनें लिहिलेल्या कांहीं ओळी म्हणजे नवसमाज-रचनेच्या लागलेल्या वेदनाच होत. तिथें शब्दप्रामाण्य किंवा पोथीबंदपणा यांना जसा वाव नाहीं तद्वतच व्यक्तिमाहात्म्याचे देव्हारेही नाहींत. या जागृत वृत्तीनं उल्हासनं कविता लिहिली आणि श्री. नारायण बापट यांनी बॅ. सावरकरांच्या राजकीय मतप्रणालीवर कडाडून हल्ला केला ! हें व्यक्तित्वांतील द्वैत नव्हे तर बुद्धि आणि प्रतिभा यांची क्षेत्रं साधणारं अद्वैत होय. जिथं जिथं हौतात्म्य दिसलं तिथं त्या सांडलेल्या रक्तबिंदूंना पाहून उल्हासला वाटलं,

बिन्दू हे जगतीं पवित्र गळती तो काळ होई सण !

पण जिथं निष्पाप रक्ताचे सडे सांडले, भयानक अत्याचार झाले, क्रूर लुटालूट झाली त्या प्रसंगांनं उल्हासनं दिलेला इषारा आजही सतत डोळ्यापुढं ठेवण्यासारखाच आहे.

' सत्य तुम्हा देतसे इषारा
पापकाल हा ठाकला पुरा
कसा कंबरा सज्ज व्हा त्वरा
वारिण्या परिस्थिति भयंकरा '

१५ ऑगस्ट १९४७ सालीं लिहिलेल्या या ओळी जरी प्रसंगोद्भव असल्या तरी त्यांचं आवाहन किती दूरगामी आणि विशाल आहे ! पण या परिस्थितीवर मात करण्यासाठीं उल्हासनं एक ' आवाहन ' केलं आहे.

' जगते जगभर जी मानवता
उत्कर्ष तिचा उज्ज्वल कविता
ठरेल नरवंशांत संहिता
संजीवनी युगांयुगांतुनी '

प्रतिभेचं आणि पर्यायानं कवीचं असामान्य स्थान सूचित करणारी ही कविता म्हणजे कवीच्या प्रखर आशावादाचा पुरावाच नव्हे काय ?

उल्हासची प्रीतिविषयक कविता अशाच एका निष्ठेनं पुनीत झालेली आहे, 'भावी सहचारिणीस' तो काय म्हणतो पहा.

'पापांपासुनि रक्षकांसम मला राखावया चाहुल
येई नित्य तुझी पडेल मग कां हें दुष्पथीं पाउल ?'

उत्कृष्ठ आणि प्रामाणिक प्रीतीची साक्ष देणाऱ्या ह्या ओळी आजच्या भ्रमरवृत्तीनं पिसाटलेल्या तरुण पिढीला स्तिमित करतील. उल्हासची सारी धडपड विश्वांत चाललेल्या धडपडींतून अक्षय टिकणाऱ्या मंगलाकडे आहे.

उल्हास, खांडेकरी किंवा माडखोलकरी थाटानं मी तुझी कुणाशीं तुलना केली नाहीं कीं तुला 'व्हिटमन्', 'स्कॉट' 'बायरन' किंवा आणखी कुणी तरी म्हटलं नाहीं. तद्वतच तुझ्या कवितांतील अलंकारांची आणि वृत्तछंदांची वर्गवारी करून पंडिती थाटानं 'रसचर्चाही' केली नाहीं. किंवा तूं 'उद्यांचा', कां 'परवांचा' कां 'तेरवांचा' कवि म्हणून ठरविण्याच्या फंदांतही पडलों नाहीं आपण जें जीवन जगतो त्यांत कांहीं मूल्यें आहेत, निष्ठा आहेत, त्याला कांहीं सामाजिक जाणिवा आणि नेणिवा आहेत याची सतत जाणीव ठेवून तूं ही उल्हासिका रसिकांच्या पुढं आणलीस यांतच तुझं यश आहे. आणि माझी तरी अशी निष्ठा आहे कीं असं काव्य हें रसास्वादासाठीं असतं आणि तेंही 'स्वसंवेद्य' असं असतं. आजच्या तरुण पिढीला आणि उद्यांच्या श्रमिक जनतेला या उल्हासिकेंतून क्षणमात्र प्रकाश मिळाला तरी मी तुला धन्य समजेन. कारण तूं जें जगलास तें काव्यरूपानं प्रकट केलंस. आजच्या नकली नाण्यांच्या जगांत तुझी उल्हासिका निश्चयानं उजळत राहील. आणि कालौघांत तुझी प्रतिभा नव्या तेजानं नटून अनुभवाचे ऊन-पाऊस खाऊन जेव्हां नवीं गाणीं लोकांच्या वर वर्षावूं लागेल तेव्हां माझ्या-सारख्या तुझ्या स्नेह्याला किती आनंद होईल तें सांगायला हवं काय ?

१-१-१९५३<br>
टिळक कॉलेज, पुणें २.

—चंद्रकुमार डांगे

( या आवृत्तींत प्रस्तावना थोडी कमी केली आहे. )

कवि उल्हास (बाकर) यांसी,

आशीर्वाद पूर्वक —

संसारीचा आनंद। संवादाचा स्वानंद।
तोडयाते भवबंध। साधक एक उल्हास॥

लौकिकाच्या उल्हास। दुःखांतरी [illegible] वास।
तेची जोडे उल्हास। उल्हास नित्य आचरणीं॥

एकाजीव बंधुकुल। त्यासीसवें सर्व मोह।
विशाल्याचा तोचि भक्त। संत ज्ञानी उल्हासी॥

दशाभयवत्ताचे तरंग। उठती जाती जो निःसंग।
तोची राही सदा दंग। आत्मानुभवी उल्हासी॥

13.3.37 — ऋग्वेदी

शु १ फाल्गुन शके १८५८.

'ऋग्वेदी' ऊर्फ कै० ती० वामन मङ्गेश दुभाषी (कारवार, विलेपारलें-मुम्बई) यांचा सविस्तर परिचय त्यांचे नातू व महाराष्ट्राचे प्रतिभावान अष्टपैलू विनोदकार मित्रवर्य पु० ल० देशपांडे यांनीं मराठी वाचकांस करून दिला आहेच. 'आर्यांच्या सणांचा इतिहास' व 'अभङ्गगीताञ्जलि' हीं कै० ऋग्वेदींचीं सुप्रसिद्ध पुस्तकें होत.

ही अत्यल्प कृति,

सर्वश्री मनोहर जगन्नाथ दळवी ( पुणें )
बाळकृष्ण केशव आगाशे ( उल्हासनगर, जि. ठाणें )
श्रीराम विठ्ठल हर्षे ( मुंबई )
कल्याण शिवराम पाटील ( आडिवली-मालवण )
रघुनाथ बलवंत फणसाळकर ( विलेपारलें-मुंबई )
विश्वनाथ कृष्ण जोशी ( दादर-मुंबई ) आणि
नागनाथ संतराम शितोळे ( पुणें )

यांना प्रेमादरपूर्वक अर्पण केली आहे.

पुणें, जानेवारी १९६६ —उल्हास

# भूमिका

[ पहिल्या आवृत्तींतील भूमिका पुढें संक्षिप्त करून दिली आहे. ]

मानवी जीवनांत काव्यरचना किंवा काव्याभ्यास हा इतका उच्च व्यासङ्ग आहे कीं त्याच्याहून अधिक महत्त्वाचें कधीं कांहींच नसतें असें मानणारा मी नाहीं. मानवी जीवनांत काव्याला एक महत्त्वाचें मनोरम स्थान आहे इतकाच दावा काय तो मला समर्थनीय वाटतो. त्यामुळें काव्यरचनेहून अधिक महत्त्वाचीं शेंकडों कार्यें करणारे लक्षावधि मानव मला जगांत दिसतात.

या विश्वासामुळेंच 'उल्हासिके'चें प्रकाशन इतका काळ लांबलें. या विलंबाचें कारण हें कीं मी प्रौढ वयांत पदार्पण करण्याच्या सुरुवातीसच जगानें दुसऱ्या महायुद्धांत पदार्पण केलें. पांची खंडांतल्या व विशेषतः भारतांतल्या मानवबंधूचीं दुःखें पाहून जें सामाजिक आणि राजकीय प्रचारात्मक वा अन्य प्रकारचें काम अधिक महत्त्वाचें वाटलें तें यथाशक्ति केलें. त्या दीर्घ धुमाळींत या कविता कुठच्या कुठे पडून होत्या. कराची ( सिन्ध ) च्या अल्प वास्तव्यांत पुस्तिकेचें हस्तलिखित लिहून तयार केलें होतें. पण मला सिंधमधून यशस्वी (!) माघार घेऊन परत यावें लागलें. नंतर साहित्याचार्य कै. न. चिं. केळकरांनीं तें हस्तलिखित वाचलें. आवडलेल्या कवितांच्या शीर्षकांवर त्यांनीं तांबड्या पेन्सिलीनें खुणा केल्या. ते प्रस्तावना लिहिणार होते. पण हिंदुस्तानची फाळणी टाळण्याचा प्रयत्न करणाऱ्या खटपटी व्यक्तींपैकीं प्रत्येकाला जें करणें जरूर होतें त्यांत मी परत व्यग्र झाल्यामुळें परत तें प्रकाशन लांबणीवर पडलें.

आपल्या कृतींचें कौतुक जर रसिकांनीं केलें तर मनाला हुरूप वाटतो. भवभूतीसारख्या महाभागाला 'उत्पत्स्यतेऽस्ति मम कोऽपि समानधर्मा' या आशेवरच आरंभीं रहावें लागलेसें दिसतें. तर मग माझ्यासारख्या अल्पमतीला, त्याच्या कवितांचें कौतुक कुणी अधिकारी पुरुषानीं केलें असलें तर ती गोष्ट लपवून ठेवण्याचें कारण नाहीं.

गुरुवर्य वीर विनायक दामोदर सावरकरांचा मी अनेक बाबतींत नितांत ऋणी आहें. रत्नागिरीला त्या महाकवीच्या घनिष्ठ सहवासांत असतांना

त्याचे किरण माझ्या मनाच्या कांचेवर पडले. कै. राम गणेश गडकरी व वीर वि. दा. सावरकर हे आधुनिक महाकवि आणि कविकुलगुरु कालिदास आणि शेक्सपीयर इत्यादि महाभाग असलीं माझीं वाङ्मयीन दैवतें आहेत.

विद्यार्थी दशेंत तीर्थस्वरूप तात्याराव सावरकरांनीं मला गणवृत्तें व मात्रावृत्तें म्हणजे काय अशा विषयांपासून सत्काव्याच्या लक्षणांपर्यंत कितीतरी गोष्टी ओघाओघानें साङ्गितल्या–शिकविल्या. प्रसंगीं, " तुझे कवितांखालीं टोपणनांव ' उल्हास ' असतें व शेजारीं ' रत्नागिरी ' असेंही देतोस, तेव्हां या कविता माझ्याच असेंच कांहींना वाटेल " असेंही ' नमनम् ', ' स्वातंत्र्यलक्ष्मीस ' प्रभृति कविता ' केसरी ' इत्यादींत आल्या तेव्हां गुरुवर्य तात्यांनीं मनमोकळेपणानें म्हणावें. यामुळें मिळालेलें उत्तेजन व झालेला गौरव याची कल्पना मलाच काय ती कदाचित् यथार्थ करतां येते. इतरहि कित्येकांकडून माझ्या कवितांचें कौतुक नीट झालें आहे. कॉलेजें आणि समारंभस्थानें या ठिकाणीं माझ्या कविता मी यशस्वीपणानें म्हणून दाखविल्या आहेत.

थोड्या चांगल्या कवितांची भर मराठींत पडण्याचा संभव आहे या मर्यादशील आशेनें हा संग्रह प्रसिद्ध केला आहे. त्यांतल्या एकाद्यासुद्धां कवितेंतील एकादी किरकोळ कल्पना जरी अगदीं दूरवरच्या अज्ञात ठिकाणच्या एकाद्या अपरिचित रसिकाला हृद्य वाटली तरीसुद्धां या संग्रहाचें चीज होईल असें मला वाटतें. त्याचप्रमाणें काव्यवाचनाइतकींच किंवा अधिक महत्त्वाचीं कार्यें करणाऱ्यांनी जर जाणतेअजाणतेपणानें माझ्या कवितांचीं उपेक्षा केली तर त्यांच्याविषयींच्या माझ्या आदरांत लवमात्र फरक पडणार नाहीं.

—उल्हास

# द्वितीयावृत्तीसंबंधीं

माझ्या ' उल्हासिका ' या काव्यसंग्रहाची ही दुसरी आवृत्ति आहे. पहिल्या आवृत्तींतील ' सूडाचें समाधान ' व ' आव्हान ' या दोन कविता या आवृत्तींत गाळल्या आहेत. कांहीं कवितांत थोडी गाळागाळ केली आहे व क्वचित भरही घातली आहे. ' उल्हासिके 'ची पहिली आवृत्ति प्रसिद्ध झाल्यानंतर ज्या कविता मी लिहिल्या आहेत त्यांतल्या दोन कविता ' वयोवृद्धांस ' व ' बालोद्यान ' या आवृत्तींत घेतल्या आहेत. काव्य हें सद्विचार व सद्भावना यांचें वाहन होऊ शकतें असें मला वाटतें. म्हणूनच कांहींश्या कर्तव्यबुद्धीनेंसुद्धां माझ्या कविता सुधारून मी माझ्या बांधवांना त्या सादर करीत आहें. हा काव्यसंग्रह अधिक जनताभिमुख व्हावा म्हणून शब्दार्थही दिले आहेत व आरंभींच्या संस्कृत कवितेचें भाषांतरही दिलें आहे. पहिल्या आवृत्तीच्या मुद्रणांत जितकी साधली तितकी लिपिशुद्धि केली होती, त्यामानानें या आवृत्तींत ती करणें मुळींच जमलेलें नाहीं. या पुस्तकाच्या बाह्यांगांत जर सौंदर्य आढळलें तर त्यांचें प्रधान श्रेय प्रतिभावान चित्रकार श्री. म. वि. सोहोनी व ' आनंद मुद्रणालयाचे ' श्री. दादासाहेब जोशी व श्री. माधवराव जोशी यांचें आहे.

पुणें; जानेवारी १९६६.

—उल्हास

# अनुक्रमणिका


| कविता | पृष्ठ |
|---|---|
| १ नमनम् | १ |
| २ रसिकसृष्टि | ३ |
| ३ विहगास | ४ |
| ४ सरिद्गान | ५ |
| ५ फुलांत मधु कुठचा ? | ७ |
| ६ अनन्य बहुरूपी | ९ |
| ७ अन्योक्तिकलाप | ११ |
| ८ आनन्द का कुणाला ? | १२ |
| ९ डोळे वटारूं नका | १३ |
| १० येवढी दया कसाया दाव ! | १५ |
| ११ कमास | १६ |
| १२ कमलिनीचा शोक | १७ |
| १३ भावी सहचारिणीस | १९ |
| १४ ही व्यर्थ कशाला लाज गडे ? | २१ |
| १५ निरोपाच्या नजरेंत | २२ |
| १६ अपराध काय मम ? | २४ |
| १७ प्रीतीची व्याकुळता | २५ |
| १८ हे सह्यादि | २७ |
| १९ चारुदत्तास | २९ |
| २० किल्ल्यांत कशाला जाऊं ? | ३० |
| २१ स्वातंत्र्यलक्ष्मीस | ३३ |
| २२ निन्दकांस | ३५ |
| २३ निद्रे | ३६ |
| २४ विचित्र लीला | ३७ |
| २५ माझ्या एका सुखास | ३७ |
| २६ देव तोच | ३७ |
| २७ रंगपंचमी | ३८ |
| २८ ज्ञात्यांस | ४१ |
| २९ निजलेल्या बालकास | ४२ |
| ३० हुतात्म्याचे रक्तबिन्दू | ४५ |
| ३१ सुभाषचन्द्रांस | ४६ |
| ३२ खण्डित हिन्दुस्तान | ४८ |
| ३३ वत्सलास | ५१ |
| ३४ वयोवृद्धांस | ५२ |
| ३५ बालोद्यान | ५४ |
| ३६ वीर सावरकर यांसीं | ५६ |
| ३७ घे रे बुध रसिका | ५८ |
| ३८ हें जीवन | ५९ |
| ३९ आवाहन | ६२ |


क्षमस्व – ५९ पृष्ठावर ५ व्या कडव्याच्या ४ थ्या ओळींत ‘आधार धरा’ हें सुधारून ‘आधार घरा’ असें वाचावें. धचा घ करावा. त्याचप्रमाणें ९ व्या पृष्ठावरील टीपेच्या तिसऱ्या ओळींतील ‘गुरुवय’ शब्द सुधारून ‘गुरुवर्य’ करावा.



उल्हासिका

# उ ल्हा सि का

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५५६९

## १. नमनम् !

( अनुष्टुप् छन्दः )

क्रीडन्ति सततं सिन्धौ वारिणो वीचयो यथा
चित्तेषु सद्विचाराणां येषामनिशमूर्मयः ॥ १ ॥
तासां बाष्पं च वीचीनां यथाम्बरसमुद्गतम्
येषां सङ्घो विचाराणां ध्येयमुत्कर्षितो हितम् ॥ २ ॥
तस्माद् बाष्पात्समुद्भूतं मेघजालं मनोहरम्
येषां ध्येयात्तथा मूर्ता विस्तीर्णाः कार्ययोजनाः ॥ ३ ॥
मेघेभ्योऽवतरत्यम्भो यथा सन्तापशान्तये
येषां कार्यं फलीभूतं जनानां दुःखमुक्तये ॥ ४ ॥
तान्सज्जनान्विनम्रोऽहं नमामि शिरसा नितम्
यथा वृक्षा जलैस्सिक्ता विनीतशिखराश्च ते ॥ ५ ॥

* * *

मराठींत अर्थ :

१. सागरांत पाण्याच्या लाटांचा सतत खेळ चालू असतो त्याप्रमाणें ज्यांच्या चित्तांत नेहमीं चांगल्या विचारांच्या लाटा उठत असतात,

२. त्या लाटांची वाफ आकाशांत पोंचते त्याप्रमाणें ज्यांचे विचार कल्याण-कारक ध्येयांतून मूर्त होतात,

३. त्या वाफेपासून रमणीय मेघ बनतात त्याप्रमाणें ज्यांच्या ध्येयांतून महान कार्याच्या योजना पसरतात,

४. त्या ढगांतून दुष्काळा ( उन्हाळ्या ) चें निवारण करणारें पाणी पडतें त्याप्रमाणें ज्यांचीं कार्यें सफळ झालीं म्हणजे जनता दुःखमुक्त होते,

५. त्या सज्जनांना, मी नम्र असा, सद्‌बुद्धीनें माथें लववून नेहमीं नमस्कार करतों कीं ज्याप्रमाणें पाण्यानें शिंपडले गेलेले वृक्ष आपले शेण्डे लववितात.

* * *

## २. रसिकसृष्टि

( वृत्त – शार्दूलविक्रीडित )

जाशी साङ्ग, गड्या, कशास रसिका आमन्त्रणा द्यावया ?
आपोआप इथे झणीं खचित ते येतील धांवूनियां
ज्यावेळीं मकरन्दगन्ध खुलतो बागेंत वृक्षावरी
कोणी जात न तेधवां द्विजकुळां साङ्गावया माधुरी ॥ १ ॥
कोठेंही रसिकांस जांचत नसे विश्वांतलें अन्तर
पाताळीं बुडती तसेच उडती आकाशगङ्गेवर
ज्योत्स्ना जैं फुलते, सुधांशु असतो तो दूर नीलाम्बरीं
तेव्हां अब्धिजलांत नृत्य उठतें पृथ्वीचिये अन्तरीं ॥ २ ॥
सामर्थ्यें स्फुरति शब्द सर्व परिसे ती दूरता जिङ्कुनी
शास्त्रज्ञीं झटुनी जणूं बसविले अदृश्य दूरध्वनी
रानीं कोकिल मन्जुकूजन करी, तैं दूर राहे कवी
त्या गाना शतयोजनांवरुनिही भाना हरूनी श्रवी ॥ ३ ॥
घेई केवल एकटी रसिकता जाणून चित्तान्तरीं
येई का कळुनी कधीं अरसिकां ती गूढभाषा परी
ज्यांना अर्थ न बोल बालक असे बोले जरी बोबडे
तत्त्वज्ञानहि क:पदार्थ गमतें मातेस त्यांच्यापुढें ॥ ४ ॥

* * *

मकरन्दगन्ध – फुलांतील रसाचा वास; आम्रवृक्षाच्या मोहोराचा किंवा फळांचा वास. द्विजगणां – पक्षांना. सुधांशु – चंद्र.

## ३. विहगास....

( जाति - रसना )

[ आधीव्याधींनीं त्रासलेला आणि दुष्टांकडून निष्कारण पीडिला गेलेला अभागी जीव क्वचित् काळीं भेटलेल्या दयाळू हृदयाकडेसुद्धां सांशक वृत्तीनें पाहूं लागला तर त्यांत नवल तें काय ? ]

जाऊं नको उडूनी विहगा, इथे बसाया
निश्शंक ये गड्या, तूं मजसङ्गतीं रमाया ॥ १ ॥
ठेवीं मनीं न भय, ही दुनिया न राक्षसांची
ही काव्यसृष्टि आहे सरिता दयारसाची ॥ २ ॥
दृष्टींत उद्भवावी शंका अशी कशाला ?
मम शब्द गोड तरिही स्थल ना हृदीं विषाला ॥ ३ ॥
सुकुमार खग धराया नच पिंजरा कवीशीं
निष्पाप पांखरा, मी तुज बद्ध प्रेमपाशीं ॥ ४ ॥
वा मारण्यास तुजला ना क्रूर पारधी मी
सप्राण चारुतेला वधिण्यासि शक्त ना मी ॥ ५ ॥
तव सूर ऐकण्याला आतूर हा किती मी !
उडतोस दूर कां तूं ? चित्तीं किती थिजें मी ॥ ६ ॥
गाणें म्हणेन भावें मधु गीत तूंहि गावें
एकांत एक व्हावें ऐकोनि तें जगावें ॥ ७ ॥
जाऊं नको उडूनी विहगा, इथे बसाया
निश्शंक ये गड्या, तूं मजसंगतीं रमाया ॥ ८ ॥

* * *

आधि – मानसिक व्यथा, चिंता. विहग – पक्षी. सरिता – नदी. खग–पक्षी. चारुता – सौंदर्य. थिजें – मी खजील होतों.

## ४. सरिद्गान

मी मागें ना परतायाची
ही अशीच पुढतीं जायाची ॥ ध्रु० ॥

सागर मी मम प्रियकर केला
निरोपुनीयां गिरिजनकाला
वाट लागलें चालायाला
निश्चय देई गति मजला नित पुढें वहायाची ॥ १ ॥

उदधीच्या अन् मत्प्रेमाचा
योग सह्य नच ज्यांना, त्यांचा--
मत्सर निर्मी नग विघ्नांचा
उल्लंघून तयास वाट निर्मीन नवी माझी ॥२ ॥

जबडा उघडी गिळण्या रागें
हेव्यानें मज दरी ही बघे
भिववितेस का राक्षसी अगे
भेदुनियां तव जबडा क्रमितें अपुल्या मार्गासी ॥ ३ ॥

सत्त्व जणू हा पाही कोणी
ग्रीष्म आटवी रक्त छळूनी
कृतनिश्चय मी मार्गक्रमणीं
जीवनकण जाणिती दिशा ती एक सागराची ॥ ४ ॥

पऱ्हे, उपनद्या थकले, सुकले
सेवक दुस्समयीं न राहिले
दाहभोग येवढेच उरले
क्रमितां पथ पुरते मज सोबत एका निष्ठेची ॥ ५ ॥

निश्चय माझा भंगायाला
कडाडुनी ये शिशिर चेतला
रुधिर लागतें गोठायाला
सागराकडे तरी हिमनदी हळुहळु जायाची ॥ ६ ॥
ज्ञात एक मज पुढतीं जाणें
पात्र सुको वा उतो पुरानें
ध्येयाहुनि मम भिन्न न जगणें
आतुर हृदयीं खळखळ गाई कविता प्रीतीची ॥ ७ ॥

* * *



गिरिजनकाला–पर्वताला (गिरि–पर्वत. जनक–पिता). नग–पर्वत; डोंगर. दाहभोग–उन्हाळ्यांतील दुःस्थिति, त्रास.

## ५. फुलांत मधु कुठचा ?

( जाति–चन्द्रकान्त )

आकाशांतुनि शरत्कालची शोभा बघण्याला
दंवबिन्दु निघे, आतुरतेनें उतरे अवनीला ॥ १ ॥

न्याहाळी मग उंच आणखीं रम्य अशा स्थाना
ज्यावरून धरणीची शोभा दिसेल नयनांना ॥ २ ॥

वृक्षावरचें पान पाहिलें तें हिरवेंगार
बसला त्यावर, नजर फेंकिली प्रसन्न चौफेर ॥ ३ ॥

वायुराज तेवढ्यांत घेई प्राभातिक ताना
झुळूक नाचे आणि नाचवी संगें पानांना ॥ ४ ॥

त्या पानांना, त्या लहरींना आवड नाचाची
नाच चालतां उरे न त्यांना चिंता इतरांची ॥ ५ ॥

शहारली तनु दंवबिंदूची, थण्डी कडकडली
नवागताला कुठे उबारा ? स्वारी गडबडली ॥ ६ ॥

केंविलवाणी मूर्ति रुपेरी घाबरून गेली
धीर करुनि जाई कलिकेला करण्या जागेली ॥ ७ ॥

म्हणे, " मैत्रिणी, उघड पांकळ्या नयन तुझे उघडीं
प्रणयाचे गे खेळ खेळतां फुलेल सुख घडी " ॥ ८ ॥

प्रिया करी सुषमेंत उषेच्या स्वागत सजणाचें
तरूंत किलबिल–मधुरमीलनीं रव वाजंत्र्यांचे ॥ ९ ॥

किंव्वा द्विजगण मंगलाष्टकें गाती हर्षूनी
बालार्काच्या सुवर्णाक्षता सहस्र स्वकरांनीं ॥ १० ॥

अखंड सेवन प्रेमसुधेच्या अतुल माधुरीचें
गुलाब फुलले नभीं, पाहुनी एकरूप त्यांचें ॥ ११ ॥

प्रेमरसाच्या भरतीवरतीं माधुरीस चाखी
अंगीं मुरल्या माधुरीस तो शाश्वतची राखी ॥ १२ ॥

अमृत मधुर तें पिऊन होई मधु दंवबिन्दूचा
बनला रसिका, मधुमय तेव्हां गाभा पुष्पाचा ॥ १३ ॥

* * *

प्राभातिक–सकाळच्या वेळीं स्फुरणाऱ्या. नवागताला–नव्यानेंच आलेल्या अपरिचिताला. सुषमा–अतिशय सुंदरता. रव–आवाज. बालार्क–कोंवळा सूर्य. स्वकरांनीं–आपल्या किरणांनीं.

## ६. अनन्य बहुरूपी

( जाति – स्वर्गङ्गा किंवा हरिभगिनी )

बालपणीं तुज पाहिलें जधीं निकट सागरा, येऊनी
उच्छृंखल शिशु भासलास त्या अखंड तुझिया लहरींनी १

संतोषें लागलों हंसाया क्रीडा त्या तव देखूनी
उकळी फुटली तुज हास्याची सशब्द फेनतुषारांनीं २

शंका आली, वेडविशी मज—नक्कल ती मद्हास्याची
स्मरण जाहलें ※विनायकाची फसवणूक तूं केल्याची ३

सरोष मन जाहलें, तुजकडे क्रोधभरें क्षण पाहियलें
लाटा ना पण अधर रुद्द तव क्रोधावेगें थरथरले ४

कळलें मग परतफेड होते द्वेषास जगीं द्वेषाची
समवृत्ति अशी जाहली जधीं निर्मळ तत्त्वज्ञान्याची ५

शान्त दृष्टि मग फेंकिली पुन्हा विशाल तव पृष्ठावरतीं
क्षणांत वाणी गंभीर तुझी आली मम सुखवीत श्रुति ६

हृदयाकाशीं प्रकाश पसरे तुझियावरच्या प्रेमाचा
शशीसवें तव खेळ पाहिला कधीं न चुकल्या भरतीचा ७

※ " शुकपञ्जरिं कीं हरिण शिरावा पाशीं ।
ही फसगत झाली तैशी ॥ "

—सागरास ( गुरुवय विनायकराव सावरकरकृत )

सर्व व्यापिती वसुधा सरिता त्यांच्याशीं तव नित मेळ
सहस्रशोडषनारीपरिवृत पौराणिक तूं गोपाळ ८

अरसिकासही काव्यें स्फुरती तुला सागरा बघूनियां
दर्शन हो त्वत्प्रतिभेचें तव जीवनगीता परिसुनियां ९

सूर्य मावळे उदासीनता मनीं तमासह दाटतसे
भयद रूप तव वातावरणीं भीषणता आणीत असे १०

सत्य रूप कोणतें तुझें तें कळे का कधीं कुणा जरा ?
अभिन्न काळीं विभिन्न रूपीं तूं बहुरूपी कुशल खरा ११

* * *

सशब्द–ध्वनियुक्त. फेन–फेंस. सरोष–क्रोधयुक्त. रुद्र–भीषण दिसणारे. श्रुति–कान. सहस्रशोडषनारीपरिवृत्त–सोळा हजार स्त्रियांनीं वेढिलेला.

## ७. अन्योक्तिकलाप

### सागरान्योक्ति

( वृत्त – शार्दूलविक्रीडित )

वाहूनी सरिता स्वयेंचि भरिती पाणी तुझ्यायेथलें
आकाशें प्रतिबिंबुनी बनविलें अंगास रंगें निळें
मीनांपासुनि घेतलेंस शिकुनी चांचल्य लाटेंतलें
वेड्या, सांग परंतु हें कुठुनियां क्षारत्व संपादिलें ?

### कमलान्योक्ति

सौन्दर्यें, मकरंदगंध खुलतां भृंगास जें लोभवी
पावित्र्यें फुलुनी अहा कमल हें देवासही शोभवी
का हो हें रमणीय नंदनवनीं उत्फुल्ल झालें असे ?
छे, छे, तें तर पंकपल्वलगृहीं जन्मास आलें असे !

### स्वातिजलान्योक्ति

( स्वाति नक्षत्रांत पडलेल्या पावसाच्या थेंबापासून मोतीं बनतात असा जुना कविसङ्केत आहे. )

अब्धीमाजि असंख्य थेंब मिळुनी जावोत मेघांतले
स्वातीचे परि जे तुषार पडती आकाशगंगेतले
त्यांना क्षारजलीं असे मिसळणें सिंधूतल्या वावडें
घेती मौक्तिकरूप; अब्धितलची जागा तयां आवडे

* * *

मीन–मासा. क्षारत्व–खारटपणा. भृंगांस–भुंग्यांस. पंक–तळें. पल्वल–चिखल. स्वातीचे–पंधराव्या नक्षत्राच्या काळांत पडणारे.

## ८. आनन्द का कुणाला ?

( जाति–रसना

[ कांहीं घटना वरवर सुंदर भासल्या तरी त्या फार दुःखदायक असतात. ]

वन रम्य दूर राही बन्दींत पिंजऱ्याच्या
शुक गीत गोड गाई आनन्द का कुणाला ? १
नव आरसेमहालीं जातां खळून कांचा
श्रुतिरम्य नाद होई आनन्द का कुणाला ? २
गालीं कुणी सुरूपा दुःखाश्रु ढाळतांना
आभास मौक्तिकांचा आनन्द का कुणाला ? ३
भूकम्प घोर होतां सर्वत्र पुष्करांची
खेळे तुषारमाला आनन्द का कुणाला ? ४
वणव्यांत चन्दनाची घे पेट वृक्षराजी
वितरी सुगन्ध सारा आनन्द का कुणाला ? ५
होतील अन्ध डोळे विझणार ज्योत आतां
अन्तीं चढे प्रकाशा आनन्द का कुणाला ? ६



शुक–पोपट. आरसेमहाल–सर्वत्र आरसे लावलेला महाल; ऐनेमहाल. पुष्कर–कारंजें. वृक्षराजी–झाडांची राई.

# ९. डोळे वटारूं नका.

( वृत्त-शार्दूलविक्रीडित )

खेळे बालक हें, नव्हे गमतसे आनन्दमूर्तीच ही
आकाशीं जणुं चन्द्र शोभत असे शोभे तसें हें गृहीं
अज्ञानें जरि जाहल्या कितितरी निष्पाप याच्या चुका
साम्भाळून तयास घ्या मृदुवचें, डोळे वटारूं नका १

जें जें या जगतीं नवीन दिसतें तें तें तयाला हवें
क्रीडालोलुप मानसीं नवनवी आशा सदा पालवे
क्रोधें दृष्टिकटाक्षबाण करुनी पंखांस विन्धूं नका
पक्षी स्वैरपणें नभीं विहरतो – डोळे वटारूं नका २

आकांक्षा रमणीयशा उगवती चित्तांत बालांचिया
कासारीं कमलें जशीं उमलती सूर्यास पाहूनियां
त्यांना कौतुकदृष्टिलाभ घडवा वाढावया सारखा
नैष्ठुर्यें चुरडूं नका सुमदलें, डोळे वटारूं नका ३

पाहूनी नवविश्व बालक जगीं साशंक चित्तान्तरीं
जागी उत्सुकता-न खेळ भलता, निर्भीड प्रश्नां करी
प्रौढांचा व्यवहार कृत्रिम नसे त्यांना मुळीं ठाउका
जिज्ञासा जगवा, तिला दडपिण्या डोळे वटारूं नका ४

तोंपर्यंत टिकोच अल्लडपणा – हें खेळणें, वाढणें
झंझावात सुटून संस्कृतिरणीं ना जोंवरी झुंजणें
बाल्याचा सुकुमार अंकुर कुऱ्हाडींनीं दुखावूं नका
सोडा निर्दयवृत्ति पार असली, डोळे वटारूं नका ५

होतें खेळत पूर्वजन्मचरितीं स्वर्गांत देवाकडे
घेऊनी उडुकन्दुकां बसतसे स्वर्गांगनांच्या कडे
तारा भूवर येतसे तुटुनियां, घेण्यास त्या कन्दुका
छोटा धांवत देवदूत उतरे, प्रेमें चला घ्या सुका-
—डोळे वटारूं नका ६

* * *



क्रीडालोलुप—ज्याला खेळ प्रिय आहे असें. कासारीं—तळ्यांत. सुमदलें—फुलांच्या पांकळ्या. संसृतिरणीं—संसाराच्या खाईत. सुकुमार—कोमल. उडु—तारका. कन्दुक—चेंडू. स्वर्गांगना—अप्सरा; देवलोकांतल्या स्त्रिया.

## १०. येवढी दया कसाया दाव !

( जाति–चंद्रकांत किंवा पतितपावन )

[ सुरीच्या धारेखालीं ठेवलेला जीव याहून दुसरी इच्छा काय करणार ? ]

मागत नाहीं अभयदान मी नको दयेचें नांव !
पाषाणहृदीं कसा कृपेचा व्हावा प्रादुर्भाव ? १
चारापाणी मांसाचा मम वाढविण्याला भाव
दिलास आजवरी तो मानीं उपकारांचा भाव २
तुझिया दारीं गिऱ्हाईकांचा असे लोटला गांव
आतुर झाले माझ्यावरतीं मारायाला ताव ३
कसाब मानव जिकडे तिकडे स्वार्थी सारे साव
वृथा कशाला पळूं जगाया करीत धांवाधांव ? ४
दाद न मजला मिळेल कोठें असा जगाचा डाव
दुबळ्यांचा ना प्रबलांपुढतीं निभाव परि पाडाव ५
पैलथडीं जगताच्या दिसतो माझा मजला गांव
इहलोका या ओलांडाया मृत्यूची ही नांव ६
हंबरडा हा ऐकवितो का जगण्याची मम हांव
छे, छे, घेणें मरतां मरतां देवाजीचें नांव ७
जीव दवडिण्या दे न यातना वेळ न भारी लाव
करण्याला धड शिरावेगळें एकच घाली घाव—
—येवढी दया कसाया दाव ! ८

* * *

इहलोक–हें जग. पैलथडीं–पलिकडे.

## ११. कमास........

( छंद–देवीवर )

निळ्या निळ्या साडींतून नको घालं येरझारा
लावूं नकोस चटका दर्शनाचा देत वारा १
निळ्या निळ्या साडींतून धांदलीची तुझी चाल
ठिकाणींच्या माझ्या मना सये, करिते बेताल २
निळ्या निळ्या साडींतून तुझें दुरून पहाणें
निळ्या निळ्या आकाशांत चांदण्याचें डोकावणें ३
सदा निळ्या साडींतून पदराची हालचाल
निळ्या निळ्या सागरांत लाटांतून चाले खेळ ४
निळ्या निळ्या साडींतून तुला हंसण्याचा भर
बागेंतल्या ताटव्यांत मोगरीला ये बहर ५
निळ्या निळ्या साडींतून तुझे भुलवीती डोळे
राजहंसा, बोलावीती तुला तळ्यांत कमळें ६
निळ्या निळ्या साडींतून लांब वेणी डोलतसे
माझ्या मधुर आशांचा जणू गोफ गुंफतसे ७
निळ्या निळ्या साडींतून तुझें लाडीक बोलणें
कोटरींच्या कोकिळेचें गोड गोड येई गाणें ८
निळ्या निळ्या साडींतून दूर जाशी चूपचाप
ठेवुनीयां माझ्या मनीं मूकतेचे गोड छाप ९
निळ्या निळ्या साडींतून येईजाई वारंवार
निळ्या निळ्या ढगांतून चातकाला मिळो धार १०

* * *

कोटर–घरटें. चातक–पावसाच्या पाण्यावरच काय तो जगणारा एक पक्षी. कमा–१ सौंदर्य २ एक विशेषनाम.

# १२. कमलिनीचा शोक.

[ कुठे सुंदर कमलिनी, आणि कुठे भुंगा ! त्यांचा संयोग म्हणजे कविजनांना मधुरमीलनच वाटत आलें हें नवल नव्हे का ? ]

( वृत्त–शामला )



झालें कशाला सुंदरी ?
गाभ्यांत कां ही माधुरी ?
होतें कळी होतें बरी !
उत्फुल्लता घाता करी १

काया सुमाची कोमला
कां लाभलेली ही मला ?

आसक्त भुंगा लोभला
कीं काळ भारी कोपला !	२

येथे फुलांच्या भोंवतीं
भुंगे पहा घोंघावती
तर्कास छेदी पद्धति
दैत्यांचिया हातीं रति	३

ऐशा अलींवांचून या
येई न का धाडावया
स्वर्गांतुनी देवा, तुझ्या
साजेलशा नामी प्रिया	४

झाली पुरे ही पुष्पता
लाभो सुखी पाषाणता
कोमेजवूनी मुक्तता
देशील का संध्ये, अतां ?	५



अलि—भ्रमर; मधुकर; भुंगा. पुष्पता—फुलाचें जीवन. पाषाणता—दगडाचें जीवन.

# १३. भावी सहचारिणीस....

( वृत्त–शार्दूलविक्रीडित )

गाइं गायन मी तुझ्यावरि – जरी नाहींस तूं ऐकण्या
डोळे लावुनियां बसें – तव दिशा अज्ञात माझ्या मना
पाहीं वाट सदा-जरी न कळणें येशील केव्हां घरीं
ना लाभे सहवासही क्षण-तरी तूं ओळखीची पुरी १

आयुर्मार्ग तुझा कुठून जगतीं जाई सखे संप्रति ?
सौन्दर्यांत त्वदीय, सौख्यशिखरें शोभेंत का नाहती ?
त्या भाग्यांत असेच मान्य तुजला माझी समा वांटणी
ती तूं भोग मदर्थ; गोड स्मृति त्या येशील ना घेउनी ? २

कीं मेघांत जशी अनाथ, अबला विद्युल्लता सांपडे,
तैशी तूं विपदांत जीवितपथीं एकाकिनी का गडे ?
व्हाया मी तव सारथी – कर तुला द्याया निघालों परि
—पोचूं सांग कसा स्थला तव ? मधें अज्ञाततेची दरी ३

औत्सुक्यांत मनांत कंप उठती, “ होतील भेटी कुठे ? ”
वाळूही विरुनी नटेल रण जैं बागेपरी गोमटें
येतां तूं जवळीं शुभे, शरमुनी जातील तीं संकटें
बालार्का वरतां उषा तमभयें गेलीं कुठेच्या कुठे ! ४

“ अब्धीवीण दुजा स्थळास न कधीं जाणार कोठें नदी ”
वा त्याची भरती तिच्याविण कुणी वेईल कैशी हदीं ?
वाटेला मिळणार वाट अपुली याची असो निश्चिति !
आशांना मधु साधण्यास जगतीं जीवांस आली गति ५

पापांपासुनि रक्षकांसम मला राखावया चाहुल—
येईं नित्य तुझी पडेल मग कां हें दुष्पथीं पाउल ? ६

* * *



गोमटें–सुंदर.

## १४. ही व्यर्थ कशाला लाज गडे ?

( जाति–नववधू )

ही व्यर्थ कशाला लाज गडे ?
भावनाव्यक्तता कुठे अडे ?
मनांत तुझिया खळबळ उडते
दडवायाची लटपट फसते
यत्न सर्व होती निष्फळ ते
चौर्य मात्र होई तव उघडें ॥ ही व्यर्थ० ॥ १ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५५६९

नसतां दिसतों मी तुज नयनां
असतां जवळी मज बघसी ना
सांग, काय परि तुला मजविना
दिसणार दुजें दुसरिकडे ? ॥ ही व्यर्थ० ॥ २ ॥
निरखिसि मम उमटतीं पाउलें
पथांत परि भेटतां प्रेमलें,
धरितेस कसे मार्ग निराळे ?
जरि ध्यान सर्व मम पदांकडे ॥ ही व्यर्थ० ॥ ३ ॥
ओंवितेस किति दुसरीं नांवें
—ओव्यांतुनि, परि मनीं जें हवें
मम नांव न तें तुजला ठावें !
जें आठवूनही मुखीं दडे ॥ ही व्यर्थ० ॥ ४ ॥
तुजपासुनि तव दूर पळे मन
झटसी दिसण्या जैशी जोगिण
खेळशील हा लपंडाव पण
किति काळ अतां तूं सांग, पुढें ? ॥ ही व्यर्थ० ॥ ५ ॥

* * *

जोगिण–संन्यासिनी; विरक्त स्त्री.

## १५. निरोपाच्या नजरेंत....

( छंद–देवीवर )

निरोपाच्या नजरेंत    मला पुरा घे पिऊन
नेत्र नकोस चाळवूं    दृष्टिआड मी होईन    १

निरोपाच्या नजरेंत    सांठलेला इतिहास
तुझ्यामाझ्या ओळखीचा    नीट वाचूं ये तयास    २

निरोपाच्या नजरेंत    उषा डोकावे तेजाची
ओसंडून येई आशा    तींत पुढच्या भेटीची    ३

निरोपाच्या नजरेंत    तुझ्या नयनांत पाणी
धीर आंसूंत ओघळे    तुला व्याकुळ देखूनी    ४

निरोपाच्या नजरेंत    कधींकाळीं घडलेलें
अविचारींचें भांडण    जावो सरून सगळें    ५

निरोपाच्या नजरेंत    कां तूं कांवरीबावरी ?
माझें असेंच राहील    मन पुढें तुझ्यावरी    ६

निरोपाच्या नजरेंत    घालितेस किती धाक !
बजाविसी का अथवा    'प्रीत एकनिष्ठ राख'    ७

निरोपाच्या नजरेंत    एकवटे तुझें सारें
प्रेम आणखी सौंदर्य    चिरकाल वाढणारें    ८

निरोपाच्या नजरेंत    शीतलश्या दोन ज्योती
दूर जातां प्रियकरा    पाठवणी ओंवाळिती    ९

निरोपाच्या नजरेंत    वसुधेला तोषवून
जाती संध्येचे किरण    उद्यां येण्या परतून    १०

निरोपाच्या नजरेंत    अशी करूं देवघेव
आणि स्मृतीवर तिच्या    रमतील दोन जीव    ११



शीतल–शांत; सौम्य; नयनमनोहर.

## १६. अपराध काय मम ?....

( जाति–भूपति )

अपराध काय मम जाहला सख्या सांग
आटला लोभ, कां मजवर करिसी राग ?

मज तूंच पाजिलें उत्तेजनजीवन
तरु वाढतसें मी, पानें गाती गान
कां माळीदादा झांकिले अतां कान ? ॥ अपराध काय० ॥ १ ॥

सोडशील वचशर रिता करुनियां कोश
झेलीन तयांना, मानीन पुरा तोष
पण नसे सह्य हा अबोल्यांतला रोष ॥ अपराध काय० ॥ २ ॥

कां लोभ दाविला सोडुनि देण्यासाठीं ?
फुलविलींत सुमनें का निर्माल्यासाठीं ?
तोडण्यासि दोरी सांधिल्यात का गांठी ? ॥ अपराध काय० ॥ ३ ॥

* * *

उत्तेजनजीवन–उत्तेजनाचें पाणी. शर–बाण. कोश–भाता. निर्माल्य–सुकून गेलेलीं पूजेचीं फुलें.

# १७. प्रीतीची व्याकुळता

क्रम ...५३६३९.... दि: ...काम
क्रमांक ....५२३९. नों: दि: २३।७९

( जाति-भूपति )

प्रियकरा, तुला मी सांग कशी आलिंगूं ?
कां समतेच्या वंचनेमधें मी झिंगूं ? १

त्वत्स्पर्शविद्‌युतीं काया कां बहरावी ?
स्वप्नसृष्टींत कां सौख्यशुद्ध हरवावी ? २

साकल्यें पाहूं जातां दुरुनी रूप
तें अंतर मधलें देई कष्ट अमूप ३

जाऊन लोळतां श्रद्धेनें पायाशीं
पळतात दूर मुखसौंदर्याच्या राशी ४

तव शब्द ऐकतां जीवाच्या कानींही
भानहीन होई मूर्ति देखिण्यालाही ५

जिवलगा, सांग तुज पुरी कशी मी भेटूं ?
बलहीनतेंत का सदैव कंठीं दाटूं ? ६

द्‌वैताच्या लतिकेवर कां फुलते प्रीती ?
तगमगती प्रेमी जर अद्‌वैतासाठीं ७

* * *

वंचना–फसवणूक. साकल्यें–सर्व एकदमच. बलहीनतेंत–असमर्थतेंत. द्वैत–दोन भिन्न व्यक्तींचें अस्तित्व. अद्वैतासाठीं–एकरूप होण्यासाठीं.



## १८. हे सह्याद्रि

( जाति–केशवकरणी )

कितीक पर्वत उंच नभाला भिडुनी दिपवीती
जनांच्या नजरा डौलानें
सह्याद्रि, तरी थोर थोरवी तव इतरांहूनी
जाणिली खऱ्या मराठ्यानें १

स्फूर्तीनें सामर्थ्य मिळविण्या करितों तव ध्यान
देतसों पहिला तुज मान
पायथ्यावरी शतकोंशतकें कवी गात गान
आदरें लववितात मान २

ऐतिहासिक नि वर्तमानच्या तव मानस्थानां
हृदीं भरलेल्या स्तवितांना
कृतज्ञतेचीं नको निराळीं काव्यें पितरांना
मंदिरें निसर्गदेवींना ३

बनते झारी जादूची तव सुटतां प्रीतिझरे
जलें फुलवितोस पाषाण
त्वत्स्पर्शें चैतन्यें होती प्रसन्न जे वारे
फुंकिती मृतांमध्यें प्राण ४

कुशींत बिलगूं, आश्रयें तुझ्या करूं जधीं हल्ले
धरावें दूर परीं पल्ले
छातीवरतीं मंडित झाले कार्यांचे किल्ले
शिपाया, शौर्यांचे बिल्ले ५

महाराष्ट्राच्या पुण्याईनें धोका ना लवही
तुझ्यावर झाडखड्यालाही
भूकंपां, लाव्हालहरींना शपथ निसर्गाची
असे दिन दिसोत पुढतींही ६

शुभशिखरांनीं शोभल्या नगा, तूं उत्कर्षाच्या
रवीच्या उदयाचा शैल
पुराणपुरुषा, तुलाच ठावें नवमानवतेच्या
दिशा त्या केव्हां फुटतील ? ७

कशाला पदीं तुडवीत हिमें दुर्गम मार्गींचीं
दूरच्या कैलासा जाऊं ?
समाध जागी रायगडावर नित शिवरायाची
तिच्याशीं विलीनता पावूं ८

पश्चिम सागर गभीर स्तोत्रीं करावया सेवा
झटतसे धुवावया पाय
बोल बोबडा, भाव भाबडा तिथे महादेवा,
अर्पिला कळेल तरि काय ? ९

* * *

मानस्थानां–तुझ्यावरील आदरणीय स्थळांना. हृदीं भरलेल्या–सद्भावनांनीं भरून आलेल्या अंतःकरणांनीं. धरावे दूर परें पळे–शत्रूनीं माघार घ्यावी, पळून जावें. दुर्गम–कठीण. गभीर–गंभीर; अद्भुत.

## १९. चारुदत्तास....

निष्क्रियपणें गतवैभवाच्या नुसत्याच आठवणी काढीत बसण्याचा काय उपयोग ?

लोपतसे पौर्णिमा पिठोरी
घोर यामिनी ये अंधारी
केवळ बघुनी मनश्चक्षुंनीं चंद्र लाभ तो काय ? १

तरवारींनो, बसल्या धारी
रिपूंस होतां जरि भयकारी
तीक्ष्ण धार का स्मरून तुमची अरि तुम्हांस भिणार ? २

वणव्यामध्यें पेटे घरटें
ठेपे विहगा, दैव करंटें
आठवून गत विहार अजि तूं कसा जगीं तगणार ? ३

माथ्यावरतीं तळपे भानू
रखरखीत आतपें जळे तनु
प्रभात शीतल आठवून तो ताप कसा चुकणार ? ४

ग्रीष्मशापिता, शुष्क पुष्करा,
तुझ्या मुखींची सुकली धारा
पूर्ववृत्त तुज पुसावया ना इथे कुणी येणार ! ५

सरली सारी लौकिक सत्ता
प्रसन्न लक्ष्मी न चारुदत्ता
सगेसोयरे भूतकालच्या धनवंतां नसणार ६

* * *

यामिनी–रात्र. आतपें–उन्हानें. पुष्कर–कारन्जें. चारुदत्त–गरीब झालेला पूर्वीचा श्रीमन्त. अरि–रिपु; शत्रु.

## २०. किल्ल्यांत कशाला जाऊं ?

( जाति–उद्धव )

[ ज्यांच्या पूर्वजांचा इतिहास थोर आहे अशा व्यक्तींना पारतंत्र्यांत खितपत पडण्याची पाळी येते तेव्हां जुन्या किल्ल्यांकडे पाहून त्यांना कसें वाटत असेल ? ]

किल्ल्यांत कशाला जाऊं ? मी गुलाम परराष्ट्राचा !
स्पर्श कां करूं क्षेत्रांना शृंखलाबद्ध पायांचा
अपराध नव्हे का घोर हा दास्यांत पडायाचा ?

जगतीं न जयाला मान
नित जीवन ज्याचें दीन
जगणेंहि जयाला दान—

रिपुकडून मिळतें, त्यानें किल्ल्यात कसें हो जाणें ? १

तेथेंच पूर्वकाळांत आमुच्या वाडवडिलांनीं
हृदयाचे करुनी कोट विक्रांत खड्ग घेऊनी
झुंजतां रणीं शत्रूशीं पण जिंकियले प्राणांनीं

उभविले यशाचे वाडे
रचियले मूर्त पोवाडे
तो स्तंभ तुंग अजि मोडे

त्या स्थलीं कसा मी जाऊं ? तें स्मशान कैसें पाहूं ? २

जो रुधिराच्या शाईनें इतिहास कष्टुनी लिहिला
तो कडेकपारींमध्यें दिसतसे अतां पुसलेला
हें जीवन कसलें माझें उजळा न तयाला दिधला



परि जाउनियां नुसतेंच
आठवून झालें तेंच
तो शिळा लेख तो तोच
एकसारखा वाचुनियां		काळ कां दवडिणें वायां ? ३

पोंचतां गडाच्या द्वारीं		ती मार्गामधली रेती
अंगारापरि तापूनी		चटके देईल मना ती
बघतील क्रुद्ध डोळ्यांनीं		भंगल्या तटांच्या भिंती

लाजेंत जीव गुदमरुनी
जगणें न सह्य होऊनी
बहु गमेल मेल्यावाणी
धिक्कार करुनि घेण्या ना आज भेटणें किल्ल्यांना ? ४

पितरांच्या अपुऱ्या इच्छा येतील भूतरूपानें
ताडितील शापवचांनीं आसूडांच्या त्वेषानें
ते जुने जुने वटवृक्ष थुंकितील अपुलीं पानें
माहीत पुरें हें सारें
किल्ल्यांत वसे जें वारें
होतील मनावर मारे
जोंवर नवयश न स्वतःचें तोंवर न गडीं जायाचें ५

* * *

खड्ग–शस्त्र. विक्रांत खड्ग–पराक्रमाचें साधन होणारें शस्त्र. तुंग–उंच. आसूड–चाबूक.

## २१. स्वातंत्र्यलक्ष्मीस...

( वृत्त–सुमंदारमाला किंवा वागीश्वरी )

तुझा लाभुनीयां अलङ्कार भारी जगीं स्त्रीस सौन्दर्य येई नवें
स्वराज्यांतली सम्पदा तूं जियेच्या गुणें आणि नांवेंहि झरी आठवे
वधायास दैत्यांस सावेश दुर्गा जणूं सत्स्वरूपीं तुझ्या येतसे
सुशक्ती प्रतीकें तुझ्या मूर्त झाल्या, नृवंशांतलें तेज तूं दिव्यसें १

निळ्या अंबरीं स्वस्थळाहून तारा कधींही ध्रुवाचा जसा ना ढळे
तयाला तुझा भीष्मनिर्धार स्पर्धी महासंकटीं जो जरा ना चळे
रवीच्या रथाचा तुला योग्य घोडा रणीं मांड ठोकून झेंपावया
असंख्यात शार्दूल हर्षून गेले तुझ्या दर्शनाला शुभे, घ्यावया २

अहा संभवानें तुझ्या पावलेलीं महाधन्यता भारतीं सत्कुलें !
नृपाधांग आदर्श केलें तुवांची, प्रजा हीच झालीं तुझीं लेंकरें
जरेच्या छटा नित्यचैतन्यगंगे, तुला लांछवाया धजाव्या कशा ?
दिशा दावुनी लुप्त तारुण्यवर्ती जशी कीं नव्या तूं युगाची उषा ३

स्वयें व्योम सोडोनियां वीज झाली तुझी सिद्ध दासी करींची असि
पुन्या स्तम्भिताश्चर्य अब्धींत लाटा अशा हालचाली रणीं दाविशी
तुला आपुल्या विक्रमा दाविण्याला मही वाटली कीं अपूरी अशी !
चिता होय सोपान, ज्वाळांवरूनी दिशा–काल दोन्हीहि ओलांडिशी ४

जगीं ना कुणी पाशवी शक्त सत्ता कराया तुझा वारसा खालसा
जसा कैरवीं वास हो शारदेचा हृदीं वंशजांच्या तुझाही तसा
स्मृतीच्या तुझ्या खोल पाळामुळांनीं इथे स्फूर्तिवृक्षें धरा व्यावृता
जनांना मिळो थोर छायेंत त्याच्या सदा धैर्य, सन्मार्ग अन् शांतता ५



* * *

श्री–वैभव, शोभा. सावेश–आवेशयुक्त. प्रतीकें तुझ्या–तुझें प्रतीक घेऊन; तुझ्या रूपांत. भीष्मनिर्धार–दृढनिश्चय. शार्दूल–पराक्रमी पुरुष. संभव–जन्म. जरेच्या–वृद्धपणाच्या. व्योम–आकाश. असि–तलवार. मही–पृथ्वी; जग. सोपान–जिना. करवीं–चंद्रविकासी कमळांत. व्यावृता–व्यापली गेलेली.

## २२. निंदकांस....

( वृत्त—वियद्‌गंगा )

महंतासंगतीं येतां मठाच्या शिष्यिणी कोणी
म्हणाया ना चुकायाचे, "अहो येथें मुरे पाणी" १

प्रवासी पीतसे प्याला पयाचा नारळीखालीं
तयाला "मद्यपी" ऐशी कुसंज्ञा प्राप्त जाहाली २

क्रमांका उच्च घेऊनी परीक्षा होत उत्तीर्ण
"तयें संधान बांधीलें" वचां या ऐकती कर्ण ३

गऱ्यांना टाकुनी देती नि घेती चारखंडांना
गुलाबांना न हुंगूनी पहाती तीक्ष्ण काट्यांना ४

व्रणावांचून का कोठें बसाया स्थान काकाला ?
सुरांची माधुरी कैशी कळावी कुंभकर्णाला ५

अम्हांला निंदकांनो, द्या कितीही दूषणें तुम्ही
तयां मानूं मिळालेलीं जगींचीं भूषणें नामी ६

जुमानी सूर्य का केव्हां ढगांच्या क्षुद्र आरोळ्या ?
प्रकाशे शेवटीं तेजें, उपेक्षी सर्व त्या चाळ्यां ७

कपींच्या चेष्टितांऐसा गमे यांचा अम्हां धंदा
पथानें आपुल्या जातों, कुणी निन्दा, पदां वंदा ८

* * *

पयाचा—पाण्याचा. संधान—वशिला. गरा—फणसांतील खाद्य भाग. चारखंड—फणसाची साल (न खातां टाकून देतात ती). व्रण—जखम. काक—कावळा. कपि—माकड.

## २३. निद्रे,

( वृत्त–शार्दूलविक्रीडित )

निद्रे, ये मजला जरा निजविण्या अंकांवरी आपुल्या
प्रेमानें जननी जशी निजविते बाळास कंटाळल्या
डोळ्यांना अपुल्या मिटून अगदीं आदित्य तो झोंपला
इंदूही विटुनी कुठे बघ अमावास्येस या लोपला १

देण्याला न कुणीच धीर उरलें–मोठें पडे सांकडें
राही आश्रय एक मात्र तव, तो दे शीघ्र आतां गडे
मायेचें तव पांघरूण मजला घालावया सत्वरीं
ये, ये, सह्य न हा विलंब; घुसते चित्तीं भयाची सुरी २

रात्रीचा सगळीकडे पसरितो थैमान सैतान तो
काळा वेष कुकर्मदर्शक करी, काळे दिवे लावितो
दश्यां रातकिडे जरी भयद या पाहून आनंदले
आहें मानव मी, शकें न बघण्या हे रंग रात्रींतले ३

मी सोडून दुजें नुरे न तुझिया गोडींत जें गुंगतें
प्राणें युक्त नि प्राणहीन सगळे, स्वप्नीं तुझ्या दंग ते
कां लोभीं तव पक्षपात असला चाले तुझ्या मंदिरीं
वेलींच्या निजल्या कळ्यांवर तुझी माया, न माझ्यावरी ४

होई लोक असह्य, त्यांतुनि जरा देशील का मुक्तता?
निद्रे, येउनियां हरून मम ने चित्तांतली व्यग्रता ५

* * *

अंकांवरी–मांडीवर. आदित्य–सूर्य. इंदु–चंद्र. सांकडें–संकट. लोक–जग.

## २४. विचित्रलीला

( जाति–भूपति )

मज वाटत होतें, ' मोठा आहें ज्ञानी '
उपहांसलें मला लेखुनि जग ' अज्ञानी '
परि सागर कळुनी खोल खोल ज्ञानाचा
अन् निरास होउनि पुरा सुलभ गर्वाचा
ये कळून, राही मनुज किती ' अज्ञानी '
तों आरोपाया मला लागले ' ज्ञानी '

## २५. माझ्या एका सुखास....

( वृत्त–अर्धवियोगिनी )

तुज पाहुनियां कुठेतरी हुरळूनि तसाचि धांवतों
न कधीं मज लाभसी करीं मग निष्फळताच पावतों
मग होत निरिच्छ अंतरीं तुज विस्मरण्यास लागतों
तितुक्यांत मिठी तुझी परी पडुनी हृदयीं सुखावतों

## २६. देव तोच....

( जाति–दिण्डी )

दिसे कोठें विश्वांत गूढ कांहीं
तिला शोधाया मनुजबुद्धि जाई
तिच्या ये न करीं उडे उंच उंच
आणि पंडित वदतात ' देव ' तेंच

* * *

## २७. रंगपंचमी

( अनुष्टुप् छंद )

[ कवीच्या ' शिववंश ' या संकल्पित काव्यांतला एक अपूर्ण सर्ग ]

सणांची सगळ्या राणी सजली रंगपंचमी
स्वयें लक्ष्मी तिची दासी, कांहीं ना उत्सवा कमी १

धनवंत लखूजीच्या मराठे जमले घरीं
पौर्णिमेला जसे तारे, चंद्र, ग्रह अंबरीं २

थोरांचें लक्ष वेंधूनी बालकें दोन खेळती
उच्च वृक्षांसवें छोटीं फुलझाडेंच वाढतीं ३

स्वभावें करिती बाळें प्रौढांच्या बघुनी कृती
एकमेकावरी दोघें महालीं रंग फेंकिती ४

उठे लहर हास्याची जलाची सागरीं जशी
कणस्फूर्ती गुलालाची फेनवारितुषारशी ५

जेधवां रम्य चित्रा त्या जाधवा पाहण्या रुचे
विनोद सुचला वृद्धा; कवीला काव्य कीं सुचे ६

गौरीशंकर अंकींचा शहाजी आणि शोभली
नंदादेवी जिजाबाई, बालकें किती सानुलीं ! ७

शिशूंच्या स्पर्शूनी पाठी कौतुकें राव बोलला
" वीर आणि जयश्रीचा जोडा हा शोभतो भला " ८

हर्षें सांगत सर्वांना मालोजी सुटला तदा
जाधवांची अतां कन्या आमुची कुलसंपदा ९

घेई गंभीर अर्थानें विनोदवच भोंसला
दिलें बालकरीं काहीं हवें तें नित्य त्याजला १०

पाहूनियां तसें झालें क्रोधें जाधव पेटतो
सुप्त ज्वालामुखी निद्रा टाकुनी आग ओकतो ११

कशी देईन मत्कन्या पुत्राला तव चाकरा ?
महाद्रीची मिळे कन्या सागरा, नच निर्झरा १२



शब्दें ना परि शब्दांनीं हृद जात दुभंगुनी
हिम ना तें शिलाघातें रश्मींनीं वितळे झणीं १३

विदीर्ण हृदयीं झाला भोंसला अवमानिला
सोयरीकप्रतिज्ञेनें दुजा कीं भीष्म भासला १४

मनीषांच्या कळ्यांतूनी अस्तित्वें फुलवावया
अशक्या शक्य व्हायाला देवी, दैवी हवी दया १५

ईशाला आळवायाला नोकरी टाकुनी घरीं
शेतकी करूनी राही; जपमाळ धरी करीं १६

प्रतिस्पर्धी लखूजी हो तयाचा पहिला धनी
कुलदेव बने स्वामी, उरे जो नित्य चिंतनीं १७

* * *

अंबरीं- आकाशांत. कणस्फूर्ति-उधळले गेलेले कण. वारि-पाणी. सानुलीं-चिमुकलीं व देखणीं. रश्मींनीं-किरणांनीं. मनीषा-इच्छा.

## २८. ज्ञात्यांस

( गद्यकाव्य )

१ ज्यांच्या श्रमांमुळें तुला शिक्षण मिळालें त्यांच्यावरच तूं उलटला आहेस. बांधवांच्या अज्ञानाचा लाभ घेऊन व थोतांडें उभारून तूं त्यांना लुटीत आहेस. दुबळ्यांना फसविणाऱ्या आणि लुटणाऱ्या संभावित संस्थांना मदत करण्याचा अमानुषपणा तूं करीत आहेस. दयेनें पाजलेल्या दुधाचें विष बनवून उपकारकर्त्याला दंश करून ठार मारणाऱ्या सर्पासारखा तूं आहेस.

२ तूं ज्ञानाच्या घमेंडींत आहेस. तुझें पोषण केल्यानंतर जीवनाच्या भारानें वांकलेल्या आपल्या साहाय्यकांचा तुला विसर पडला आहे. क्षुल्लक गोष्टींत कालापव्यय करणाऱ्या तुझ्या बांधवांना तुला कांहीं सांगावेसें वाटत नाहीं काय ? कुणाकडून कधींही वाचल्या न जाणाऱ्या कोपऱ्यांत पडलेल्या पुस्तकासारखा किंवा तृषार्तांना ज्याचा उपयोग नाहीं अशा ओसाड जागेंतल्या कूपासारखा तूं आहेस.

३ हे ज्ञात्या, तुला मात्र मी वंदन करीत आहें. संसारी सज्जन श्रमून-दमून आपल्या कुटुंबासाठीं काम करतो त्याप्रमाणें तूं आपलें ज्ञान आमच्यासारख्या अज्ञांना मदत करण्यासाठीं मिळविलें आहेस. सूर्याची प्रभा फांकूं लागल्यावर, कळ्यांची फुलें होऊन वृक्ष जसे हंसतात तसे आम्हीही तुझ्या ज्ञानसाधनेनें उत्स्फूर्त आणि प्रसन्न होतों. तूं पाऊस पाडणाऱ्या मेघासारखा रमणीय आहेस. सौख्य धुंडणाऱ्या मानवांचा तूं अंधारांतला दिवा आहेस. तान्ह्याला दूध मिळावें म्हणून सकस अन्न खाणाऱ्या मायाळू मातेप्रमाणें तूं मानवाची सेवा करण्यासाठींच व्यासंग चालविला आहेस.

* * *

## २९. निजलेल्या बालकास

( वृत्तें–इंद्रवज्रा आणि उपेंद्रवज्रा )

निजा निजा शांत असेच बाळा,
मुळीं न चालो कसलाहि चाळा
कळीप्रमाणें नयनां मिटूनी
प्रमोद माझ्या हृदयीं भरूनी १



नाकांतुनी श्वास हळूच येई
जैसें नवें फूल सुगंध देई
गंभीर सुद्रा, तव पूर्ण मुद्रा
भोगी कुणी तापस योगनिद्रा २

लपे सुकेशीं तव कर्णपाळी
ढगांतली चंद्रकलाच झाली
तनूवरी पातळ वस्त्र सान
खळें खुले, आंत हिमांशु छान ३

नभांतल्या शीतल तारकांनीं
पहावयाला तुजला म्हणूनी
धरेवरी जे कर धाडियेले
मुखावरी ते तव थांबलेले ४

त्वदीय भ्रू कीं लवत्या कमानी
अम्हां मिळे स्वागत रोज ज्यांनीं
किती अतां त्या स्थिर पूर्ण झाल्या
तळीं तरूंच्या जणुं धेनु काळ्या ५

लकेर येतांहि मधुस्वरांची
जणूं तुझी झोंप उडावयाची
म्हणून पाल्हाळ कशास बोला ?
त्वदीय सौख्यार्थ बरा अबोला ६

मी मूक होऊन तरी बघूं ना ?
होईल का त्रास तयेंहि तान्ह्या ?
बाला, तुझ्या कोमल पापण्या या
पुष्पांचिया नाजुक पाकळ्या या ! ७

छोट्या मुठी आंवळिल्या कशाला ?
रागावसी काय अम्हां कुणाला ?
त्याआंतला तांबुस सान गाभा
का पात्र ती मी बवण्या न शोभा ? ८

वर्णावया नाजुक त्या त्वचेला
नाहीं पुरें मार्दव लेखणीला
रेशीमशय्याहि असह्य होई
निद्रेंतही स्वेद म्हणून येई ९

स्वर्गांतल्या कल्पतरूवरून
हे ओंठ होण्यास बदाम दोन
—आले, पहातां सुषमा तयांची
श्रीच्याच वाटे कृति कुंचल्याची १०

त्वद्वक्ष होई वर आणि खालीं
वर्णावया योग्य जपून भारी
तो श्वास सत्यंशिवसुंदराचा
उच्छ्वास उच्छेद तनुश्रमांचा ११

बघूनियां हें अतिरम्य दृश्य
स्फुरे रसांधाहि कला अवश्य
निसर्ग नी मानव एक झाला
मिळे अहो स्वर्ग इथे धरेला १२

* * *

तापस–तप करणारा. मार्दव–नाजुकपणा. स्वेद–घाम. त्वद्वक्ष–तुझी छाती.

## ३०. हुतात्म्याचे रक्तबिंदु

( शार्दूलविक्रीडित )

मांगल्यें, सुषमाबलें, विलसती तेजें उषेसारखे
शुक्राचें नवतेजही ठरतसे ज्यांच्यापुढें तें फिकें
ज्यांनीं हा इतिहास शोभत असे कीं मौक्तिकीं सागर
सांडी शोणित-वित्त हें अमर कीं लोकीं हुतात्मा नर १

बिन्दू हे जगतीं पवित्र गळती हो काळ तेव्हां सण
क्षेत्रांचें मिळतें स्थळांस इथल्या यांनीं पुरें लक्षण
वाहे जीवन तीर्थतुल्य इथुनी गंगा महापावना
देवांच्या दिसती तनूंत असल्या मूर्ती मनमोहना २

मृत्यूला वधिलें भया त्यजुनियां रक्तास या सांडुनी
क्लेशांच्या पिउनी विषा अमर हो कोणी सुधेवांचुनी
शैथिल्या हरवीत मानवगणां आशा नव्या द्यावया
स्फूर्तीची शुभ ज्योत एक जळते शोषीत तैलासि या ३

निष्ठेचें व्रत रूप मूर्त वरितें बिंदूंत या आगळें
किंव्वा दर्शक सत्पथा उजळिण्या आहेत हे ठेविले ४

* * *

मौक्तिकीं-मोत्यांमुळें. शोणित-रक्त. जीवन-१ पाणी २ चारित्र्य.

## ३१. सुभाषचंद्रांस

( चाल—' घे खुशाल अंकुशासि हाणमार माहुता ' या कवि यशवंतांच्या कवितेसारखी )

[ क्षयाची भावना झाली म्हणून सुभाषचंद्र बोस युरोपांत गेले होते. परत भारतांत आल्यावर ते राजकीय आंदोलनाला आरंभ करणार होते. बोटींतून उतरल्याबरोबर साम्राज्यशाही सरकारनें त्यांना अटक केली व अशाप्रकारें त्यांची व त्यांच्या देशबांधवांची ताटातूट झाली. ]

हे सुभाष, नित शुभाश, तुजसि मानवंदना ध्रु०
कंठ्य हे न शब्द रे
अश्रुपूर पाझरे
टपटप ही नयनींची भरतभूमिनंदना १



देश दास्यपंजरीं
तूं विदीर्ण अंतरीं
बैसलासि हांकण्यासि राष्ट्रकार्यस्यन्दना २

सौख्यभुवन सोडुनी
बंदिवास जोडुनी
स्थंडिलांत राहिलास देत देह इंधना ३

जाशि कंसपत्तना
दूर नंदनंदना,
गोपहृदीं जवळ येसि कंसकंदना ४

तुज न कष्ट घोर हे
भारतास भोग हे
व्यथित करित योजितील तोडण्यासि बंधना ५

* * *

शुभाश–राष्ट्रांत शुभ आशा निर्माण करणारा. कंठ्य–गळ्यांतून निघणारे, मुखांतले. नंदन–आनंद देणारा, पुत्र. स्यन्दन–रथ. स्थंडिल–यज्ञभूमि. पत्तन–शहर. कंसकंदन–कंसाचा वध करणारा. भोग–त्रास, हाल.

## ३२. खंडित हिंदुस्तान....

(जाति–नववधू)

ही आत्मवंचना पुरे करा ।
उघडुनियां डोळे पहा जरा ॥ ध्रु० ॥

राष्ट्रैक्याचें भवन भंगलें
सैतानांना रान मोकळें
कोटी कोटी भयभीत कुलें
परि तोरण तुमच्या चढे घरा ॥ १ ॥

तुमचा राष्ट्रध्वज अवमानुन
असंख्य दलितांना लाथाडुन
घरभेदी ध्वज पक्का रोंवुन
नव[1] आक्रमणा हो सज्ज पुरा ॥ २ ॥

लपले धनधान्यांचे सांठे
जीव जनांचा नेत्रीं दाटे
दूध न बाळां मिळे पहांटे
वांटतोस पेढे निलाजरा ॥ ३ ॥

अर्धनग्नता बघ राज्य करी
ना थंडी वा लाज सांवरी
तेथें तुमचे ध्वज जरतारी
सुखवितील का दैन्यांत नरां ? ॥ ४ ॥

---

१. कवीचें भाकित खरें ठरून पाकिस्ताननें काश्मीरवर पुढें लवकरच आक्रमण केलें आणि आतां तर सर्वत्रच आक्रमणाचा यत्न केला आहे.



निष्पापांचीं हजारों घरें
जळती, धूमें आकाश भरे[१]
आगीच्या डोंबांत जग गिरे
तूं अन्ध रोषणाईंत खरा ! ॥ ५ ॥

बेकारी, दुष्काळ यांवरी
बेकीवर, गोळयांसुऱ्यांवरी
बसुनि यमाची येते स्वारी
का तयास देतां हारतुरा ? ॥ ६ ॥

या राष्ट्राचे सच्चे पाइक
उपेक्षेंत, दारिद्र्यीं स्थायिक
मिरविण्यास पण इथले नायक
हे स्वार्थी आले भराभरा ॥ ७ ॥

सत्य देतसे तुम्हां इशारा
पापकाल हा ठाकला पुरा
कसा कंबरा, सिद्ध व्हा त्वरा
वारिण्या परिस्थिति भयंकरा ॥ ८ ॥

१५ ऑगस्ट १९४७

* * *

१. लाहोर इत्यादि ठिकाणीं पाकिस्तान्यांनीं केलेल्या जाळपोळीला हें उद्देशून आहे.

पाइक–सेवक. पापकाल–संकटकाल

## ३३. वत्सलास....

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत

(जाति–लीलारति)

कल्पना नि उपमा साऱ्या झाल्या जुन्या
येईल वर्णनें बरोबरी का जिण्या ? १

सांन्निध्यीं तुझिया क्षण जो लाभे मला
भूतभाविकालीं नसे तयाला तुला २

तुज गौरवावया अबला ठरतां गिरा
मानिते अल्पपर्याय मौनची बरा ३

चित्तचक्षु झटती जधीं पाहण्या तुला
तैं वस्तुअभावीं भासाच्या वांकुल्या ४

परि इथे कुठेसा तुझा उमटला ठसा !
अंधार उजळिण्या भानूचा कवडसा! ५

छे, मी न तुजपुढें सामान्यहि आरसा
कृष्ण पार्थनयनीं मावत नव्हता जसा ६

ब्रह्मार्थ तोकडी वेदर्षींची उडी
भरुनी उरसी मम अस्तित्वाची कुडी ७

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे शाखा (स्थलप्रत) १५५६९

तुला–तुलना, बरोबरी. गिरा–वाणी, बोल, वाचा. वाकुल्या–निष्फळ चेष्टा
पार्थनयनीं–अर्जुनाच्या डोळ्यांत.

## ३४. वयोवृद्धांस....

( जाति–भूपति )

तुम्हि सबल मुशाफिर या जीवनमार्गींचे
तुडवुनियां तगलां कण्टक कालपथींचे
उधळिले कष्ट तुम्ही आधींचे–व्याधींचे
ध्वज धवल मिरवितां शिरावरी विजयाचे १

वांकलांत पुरते अनुभवधन वाहूनी
बान्धवां ठेविल्या त्या ज्ञानाच्या खाणी
स्रवतसे नित सुधा पार्थिव अपुली वाणी
हत्कम्प तींत उमटती सतारीवाणी २

केलीत कुलास्तव शक्तींची कुरबानी
जी पौत्रीं विलसे विमल सुस्मितामधुनी
नीलकण्ठ गमतां भवतापविषें गिळुनी
कीं स्थितप्रज्ञ;–शर अपराध्यांचे सहुनी ३

मोलाचा आपण मानवतेचा ठेवा
देवांनीं ज्यांचा स्वयें करावा हेवा
तो गांव गुणांचा सकलांनीं गांठावा
अमरतेवरी अधिकार पुरा साङ्गावा ४

द्या आशीर्वच,–ही चञ्चलता सम्पूं दे
उपदेश द्या पुन्हा,–उथळपणा साण्डूं दे
ही तात, आमुची प्रमत्तता भङ्गूं दे
औदार्य चालवा,–मोहरात्र सम्पूं दे ५

पातलां निकट तुम्हि इतिहासींच्या धामा
वाढवून अमुच्या भवितव्याच्या सीमा
हा स्वीकारावा चुकलेल्यांचा मुजरा
येवढी शिदोरी द्या करण्यासि गुजारा ६

* * *

मुशाफिर–प्रवासी. कण्टक–कांटे. धवल–पाण्ढरे. सुधा–अमृत. पार्थिव–पृथ्वीवरील, या जगांतील. हृत्कम्प–भावनांचें स्पन्दन; भावना. कुरबानी–त्याग. पौत्र–नातू. विमल–निर्मल. भवतापविषें–संसारांतील दुःखें. स्थितप्रज्ञ–सुखदुःखाच्या पलीकडे गेलेली विचारी व्यक्ति. शर–बाण. तात–बाबा.

# ३५. बालोद्यान

( जाति–भूपति )

[ अगदीं लहान मुलेंही स्वतःची छोटी बाग करतात. ]

तुज गुङ्ग पाहुनी छकुल्या, तव उद्यानीं
किति भरून येते तनु ही भावोर्मीनीं
सङ्गोपित होती अंकुर बालकरांनीं
मूर्त होतसे कुणि कविता येथे झटुनी १

बालका धन्य तूं; मैत्री तव अनुरूप—
फुलझाडांसङ्गें; तुजसम जीं निष्पाप
बागेंत तुझा या जावो काळ अमूप
बाजार जगाचा तुला न देवो ताप २

देता तूं जल, ही बाग फुलांनीं हंसते
बोलणें तुझें अन् गाणीं ऐकुनि घेते
ही धरणी जणुं कर्तृत्वबीज तव जपते
जोपासण्यास तें मातेसम तव झटते ३

पाहोत एकदम नयन तुझे अन् सुमनें
तरळती तुझ्या सृष्टींत मधुर जीं स्वप्नें
घेतील शोषुनी हिरवीं शीतल पानें
त्या निराशा, तुझ्या बालमनाचें थकणें ४

सिंचिल्या तरुलता सपुष्प, सुफला बघुनी
नित कृतज्ञता तव वाढो अन्तःकरणीं
कोमलता द्यावी तुज पुष्पपरागांनीं
बागेसम राहीं शोभा जगता बनुनी ५

तुज मिळे सुमांचा सुभगा, सुखद सुवास
तव यशोगंध गौरवो तसा तव वंश
राघूसम रमशी रंगांच्या राज्यांत
लावण्य सर्व तें मिसळो तव कांतींत ६

उपवनांत तुझिया कुंड्या वरिती छकुल्या,
तुळशीच्या वृंदावनांतल्या मांगल्या
तव हृद्य चारुता बाग जिची ही छाया
ही नयनां अमुच्या अतीव सुखवी किमया ७

* * *



भावोर्मीनीं–भावनांच्या लाटांनीं; उत्कट भावनांनीं. अङ्कुर–कोंब. अमूप–पुष्कळ; दीर्घ. धरणी–जमीन. शीतल–डोळ्यांना सुखविणारी. सिंचिल्या–पाण्यानें शिंपलेल्या. सुभगा–भाग्यवान मुला. यशोगंध–कीर्तीचा सुवास. लावण्य–तेज; सौन्दर्य. हृद्य–हृदयाला मोहून टाकणारी. चारुता–सुन्दरता; माधुर्य. अतीव–अतिशय, फार.

## ३६. वीर सावरकर यांसीं

( वृत्त– शार्दूलविक्रीडित )

कालाशीं प्रतिकूल या तव सदा संग्राम चाले किती
ते पूर्वग्रह वंचुनी भ्रमविती येथें जनांची मति
सत्तादर्पकलंकलांछित असे वारे इथे वाहती
हातांतील तुझ्या ध्वजा ढळविणें–नाहीं कुणाची क्षिति १

दास्याच्या दृढ बंधनीं जखडली जैं मातृभू भारती
स्वातंत्र्यार्थ तिच्या सहून छळ ते चर्में तुझीं लोंबती
श्रद्धा रूढिनिशेंत राष्ट्रपुरुषा रुग्णापरी गुंगवी
आघाडीस नरावलींत दिसशी बुद्धीस जी जागवी २

मानव्यास पुरी[१] पुरी[२] यमपुरी ज्या अंदमानांतली
तेथेंही तव साधना बलधना, वाक्संपदा वाढली
ते पौराणिक अश्मही द्रवविले यत्नें तुवां कोंकणीं
अन् तेथें लिहिलीस तूं स्मृति नवी कार्यें तुझी लेखणी ३

बाल्यापासुनि चारु जीवनशशी ज्याची प्रभा आगळी
प्रज्ञा वा प्रतिभा सुसंस्कृत जनीं–ती जीवरी लोभली
विद्या भूषविण्या तुझ्या अतुल तें वक्तृत्व हो पैंजण
साधूनी पुरुषार्थ सर्व उरसी मोक्षास आकर्षण ४

सूर्याला दिपतात दीन घुबडें, त्याची न ती क्षुद्रता
पाण्याशींच तृषार्त पामर कुणी, नाहीं जलीं न्यूनता
भ्रांतीनें जन सत्पथास मुकतां एकान्त सन्नायका
देई दीपगृहीं तमांत महता एकांतची दीपका ५

१. पुरी–पुरते; गाडते. २. पुरी–पूर्णपणें.

तें ज्ञानार्जन, ध्येयवाद, धृति ती, देती तुला थोरवी
जीं गायास्तव अंधभक्तच नको किंवा पगारी कवि
सत्तत्त्वें जगसी, तयांस धरुनी आचार जेव्हां जनीं
सौख्याचा उदयाचलावर इथे येईल तेजोधनी ६



* * *

सत्तादर्पकलंकलांछित–राजकीय सत्तेच्या उन्मत्तपणामुळें कलंकित झालेले. रुग्णापरी–आजारी माणुसाप्रमाणें. मानव्यास–माणुसकीस. बलधना–सामर्थ्यवान पुरुषा. अश्म–दगड; पाषाण; खडक. स्मृति–समाज प्रगतीचीं तत्त्वें. जीवन-शशी–तुझ्या चरित्राचा चंद्र. धृति–धैर्य. तेजोधनी–( तेजाचा सांठा ) सूर्य.

## ३७. घे रे बुध रसिका—

घे रे बुध रसिका ॥ ध्रु० ॥

घे उपहार शाम,
आणी पोहे सुदाम
यत्न आज पूर्णकाम
फुटतो कंठ पिका ॥ १ ॥

चंदन गंधार्थ झिजत
ज्योति सुतेजांत विरत
सेवेंतच जीवनार्थ
नाहीं कुणि परका ॥ २ ॥

मृत्तिकेंत सुमन फुलत
चंडकरीं चाप खुलत
क्षणभंगुर अमर होत
होई भव हलका ॥ ३ ॥

* * *

उपहार—भेट. पूर्णकाम—यशस्वी. पिक—कोकिळ. चण्डकरीं—प्रखर किरणांतच

## ३८. हे जीवन असलें....

(जाति–लीलारति)

हें जीवन असलें मला नको बेगडी
गुणवेल वाढण्या जागा ही तोकडी
गुदमरतो येथें विवेक, सुख पारखें
जन जनासि फसवी; मनासि मन सारखें १

जखडते विमल तनु बाह्यरूप साधनीं
गणगोत गुंतले अदय, उथळ वर्तनीं
लोटितें जयां अज्ञान रिपूंच्या करीं
ते अमल मनें पिंजतात निंदाशरीं २

पाजिती बांधवां खुशामतीची सुरा
कापिती गळे स्वार्थाचा करुनी सुरा
लोभवी अशांची भागेदारी जयां
ते महाजन तरी प्राप्त सोडणें तयां ३

हा लिलांव बोलत पैंजण नित खुळखुळे
माणुसकी वधिली–वारांगण मोकळें
पदतलीं तुडविती शिवसत्याचे कळे
मी जातों इथुनी, माझें जग वेगळें ४

थिल्लरता माजे गांभीर्याच्या क्षयीं
द्रौपदीच झटते दुश्शासन–अनुनयीं
धारणा दुरावे, संयम सारा सरे
आधार धरा जी धरा तीच हादरे ५

लादूनि आपुली दलितांवर नायकी
स्वोद्धार साधिती कसलेले नाटकी
प्रगतीस दाविती पाठ नि नालायकी
जपितात अंध हे अध्यात्माला मुखीं ६

लपवुनियां दौलत परकष्टार्जित घरीं
हृदयहीनता तिज रक्षाया आचरी
दे क्षुधितांना उपदेशाची भाकरी
ही बारगिरी क्रांतीची कारागिरी ! ७

सुविचारसुमें तीं दुष्कृताग्नि जाळितो !
निष्पाप बालकें युद्धासुर भक्षितो
धन झटे बनविण्या प्रतिभेला पांगळी
कीं ज्ञानदेवता स्वयेंच हो आंधळी ८

लेखनीं, वचीं श्रेष्ठता विपुल वानिती
श्रेष्ठांस परी मत्सरार्थ अपराधिती
आत्मगौरवाची काढुनियां मंडळी
आदर्श जाळुनी समाज देती बळी ९

* * *

जगण्यासि पुरे मज लहानसा कोंपरा
वाहील येथुनी मानवतेचा झरा
पेटवीन ज्योती मत्प्राणांनीं इथे
होतील सार्थ मम आशा ज्वलनीं तिथे १०

जमतील सुहृज्जन या माझ्या गोकुळीं
मावेल जगत हें अखिल जयांच्या कुळीं
ते वेंचितील बळ पळ पळ सत्कारणीं
नित हंसेल येथें वर्षा घामांतुनी ११

अपमानित, पीडित जातिधर्म यांमुळें
वा शस्त्रांचें नख ज्यांना नच लाभलें
मिळतिल त्या दीनां अजिंक्य येथें बळें
इतिहासाला मग वळण किती आगळें ! १२

निष्कारण लक्ष्मी रुसली ज्यांच्यावरी
कीं न्यायच उलटे येथें नीतीवरी
या इथे तयांना मिळेल नित आसरा
जग जिंकायाची जातिल शिकुनी कला १३
जे अज्ञानानें बंद नयन राहिले
उघडतील तेजें प्रद्न्याप्रतिभाबळें
या सारे येथें, बना स्वतःचे गुरू
मावेल न विश्वीं मनुवंशाचा तरू १४
कण कळो गुणाचा असेल जो जो कुठे
हरविकार त्यानें जळो, सदा जो उठे
नित जीवन व्हावें नीतीची साधना
हौतात्म्य सुकर्मीं—ध्यास उरावा मना १५
मज खुशामतीचीं झुकवोत न मोहनें
जखडोत न लोकेषणेंतलीं बंधनें
नित परीक्षावया स्वहृदींचीं स्पंदनें
शांतता हवी मज, हवें इमानी जिणें १६
उचलील मृत्यु मग मजला शिणल्यावरी
विस्मृतींत रक्षा उडेल माझी पुरी
जन्मेन कदाचित पुन्हा मानवांतुनी
नवरूपीं उत्स्फूर्तांच्या कृत्यांतुनी १७

* * *

बेगडी—खोटें; ढोङ्गी. गणगोत—आप्तेष्ट. रिपु—शत्रु. सुरा—दारू; मद्य. सुरा—मोठी सुरी. अनुनय—प्रेमाराधन. नायकी—नेतृत्व; पुढारीपण. बारगिरी—लायकी नसतांना एखाद्या पदावर जाणें. लोकेषणा—जगांत मोठेपणा, मान, लौकिक मिळावा असा हव्यास. स्पन्दन—हालचाल, भावनांचा कल्लोळ. मंडळी—व्यापारासाठीं वा पैसे मिळविण्यासाठीं काढलेला फड ( Company ).

## ३९. आवाहन

( जाति–नववधू )



ह्या रचून कविता अशी कुणी
जी चैतन्याची अमर खनी ॥ ध्रु० ॥
जगते जगभर जी मानवता
उत्कर्ष जिचा उज्ज्वल कविता
ठरेल नरवंशांत संहिता
संजीवनी युगांयुगांतुनी ॥ १ ॥
मातृपदींची सृष्टिशीलता
पितृपदान्वित रक्षणरतता
बाल्यसुलभ स्वातंत्र्यसहजता
जी पिई भावपय यांमधुनी ॥ २ ॥
प्राप्त भवाच्या अखंड ग्रीष्मीं
वासंतिक कल्पद्रुम निर्मी
हौतात्म्याच्या प्रभवीं होमीं
पार्श्वगीत गाई गुणरमणी ॥ ३ ॥
जिच्या प्रभावीं नुरे अमंगल
पावित्र्यें दिन फुलतो पलपल
सहा रिपू जित होती हतबल
तेजोनद वाहे तमांतुनी ॥ ४ ॥
अरुण-चंद्र-ऋतु-उन्मेषांचें
निरामयांच्या चिरकांतीचें
वर्णन करितां अंशही जिचें
सुषमेला व्याख्या मिळे क्षणीं ॥ ५ ॥
ध्वज राज्यांचे, फड वादांचे
कालविपर्यय स्वार्थान्धांचे
लांछिती न कथितव्य जियेचें
सरितांना सम साऱ्या जमिनी ॥ ६ ॥

चित्रकला मुकली जी वाणी
सूर इथे स्थिर भाव बनूनी
पुरून मुद्रा उरे नर्तनीं
अवतीर्ण सर्व हीं ज्या चरणीं ॥ ७ ॥

सद्गुण जगतीं खलबलपीडित
असत्य येई यतिवेषांकित
महता मिरवी क्रौर्य अलज्जित
बदलील काळ हा मंत्रूनी ॥ ८ ॥

दा. क्र. १५५६९

जगतीं या सर्वत्र भिन्नता
थकवी चित्ता देत खिन्नता
निर्मी तेथें पूर्ण एकता
जी तत्त्वज्ञानाची भगिनी ॥ ९ ॥

भूतभविष्यीं ओंवी दोरा
दिक्कालांची जिला न कारा
भावार्द्र करी शास्त्राचारा
मरुभूमि भरील फलीं, सुमनीं ॥ १० ॥

* *

खनी–खाण. संव्हिता–(लाक्षणिक अर्थानें) समाजधारणा होण्यास सहाय्य करणारें साहित्य; वेदमंत्रांसारखी पवित्र. पितृपदान्वित–पित्याची जबाबदारीच असलेली. भावपय–सद्भावनारूपी दूध. भव–संसार. प्राप्त–न टाळतां येणारा. प्रभवीं–संभवांत; उत्पत्तींत. सहा रिपू–समाजविघातक बेबंद मनोविकार. निरामय –आरोग्यसम्पन्न व्यक्ती. कालविपर्यय–चालू काळांत निरुपयोगी किंवा विघातक ठरणाऱ्या गोष्टी. कथितव्य–हेतु; विषय; ध्येय. यतिवेषांकित–साधूचें सोङ्ग घेऊन. कारा–तुरुङ्ग. भावार्द्र–माणुसकीच्या भावनांनीं ओथंबलेला. मरुभूमि–वाळवंट.

## रसिकांचें साकार झालेलें एक स्वप्न--

## कवि ' उल्हास ' यांचें भावमधुर व स्फूर्तिशाली नाटक

" ज्यांना ऐतिहासिक दृष्टिकोण आहे त्यांच्या दृष्टीनें याच नाटकाचें नांव ' पहिला बाजीराव ' ", " असें दुसरें नाटक नाहीं ", " यांतील कांहीं वाक्यें लोक पिढ्यान्‌पिढ्या म्हणत राहतील " असे उद्‌गार नाटककार, कवि व व्यासंगी प्राध्यापक यांनीं या नाटकासंबंधीं काढले आहेत.



या नाटकाचें नभोनाट्य चार भागांत ऑ. इं. रेडिओच्या पुणें, मुंबई व सांगली या केंद्रांवरून प्रक्षेपित करण्यांत आलें व तें हजारों श्रोत्यांना अतिशय आवडलें.

तुमच्या घरीं, वाचनालयांत, विद्यालयांत व नाट्यमंडळांत ही नाट्यकृति जरूर असावी असा तिचा दर्जा आहे. रसिकांना तशीच इतिहासप्रेमी वाचकांनाहि ती आवडते. उत्कृष्ट छपाई व बहुरंगी मुखपृष्ठ यामुळें तिचें बहिरंगहि आकर्षक आहे. ( मूल्य रु. ३ ट. ख. ८० न. पै )

**प्रकाशक : चारुचंद्र प्रकाशन, ७५९।६१ कर्वे रोड, पुणें ४.**

**प्रा. न. का. घारपुरे ( म. सा. पत्रिकेंत )** लिहितात, " कवि उल्हास यांनीं हें नाटक लिहून नाट्यवाङ्‌मयांत जशी चांगली भर घातली आहे, तशीच **तरुण अंतःकरणांत स्फूर्ति उत्पन्न करण्याची योग्य कामगिरी बजावली आहे** "

( नाटकावरील आणखी अभिप्राय आंतील बाजूस पाहा. )

'सारस्वत समीक्षा' या विख्यात ग्रंथाचे विद्वान् लेखक प्रा. य. र. आंगाशे आपल्या सविस्तर अभिप्रायांत म्हणतात, "पहिला बाजीराव" हें नाटक वाचून मोठा आनंद वाटला. बाजीराव व मस्ताना यांच्या जीवनांतील निवडक प्रसंगांची नाट्यरूपानें गुंफण करून, नाट्यवस्तूचा विकास मोठ्या कौशल्यानें केला आहे. बाजीरावाची व्यक्तिरेखा आदर्श नायक या दृष्टीनें फार परिणामकारक झाली आहे...मस्तानाच्या प्रेमाचा आरंभ, विकास आणि हृदयद्रावक अंत नाटककारानें अत्यंत हळुवारपणें दाखविला आहे. ऑफेलियाप्रमाणें मस्तानाचें स्वभावचित्र फार नाजूक रंगछटांनीं चित्रित केलें आहे...बाजीराव आणि मस्ताना यांमधील शृंगाराचे प्रवेश हृदयंगम आहेत...बाजीरावाचा बालमित्र चारण याची योजना हास्यविनोदाला परिपोषक आणि गंभीर प्रसंगांमुळें मनाला पडणारा ताण कमी करणारी, आवश्यक अशीच आहे...नाटकांतील संवाद म्हणजे नाटकाचा आत्माच. या नाटकांतील संवाद त्या त्या व्यक्तीचें पूर्णपणें व्यक्तिदर्शन करणारे, प्रसंगानुरूप भाषेनें आणि प्रसन्नप्रवाहित्वामुळें मनाचें विलोभन करणारे आहेत. **'शृंगार, वीर, हास्य आणि करुण' या रसांचा मधुर आस्वाद या एकच नाटकांत पुरेपूर मिळतो.** हें सर्व रस उत्तम रीतीनें आळविण्याचें सामर्थ्य लेखकाच्या शैलीमध्यें आहे हें सहजीं दिसून येतें...प्रस्तुत नाटककाराचें अभिनंदन आणखी एका कारणानें करणें आवश्यक वाटतें...सुमारें पंधरा वर्षांपूर्वी कवि कुसुमाग्रज यांनीं ह्याच विषय 'दुसरा पेशवा' या नाटकाच्या रूपानें सादर केला...असें असतां तीच नाट्यवस्तु पुनः घेऊन तिच्यांतील ऐतिहासिक सत्य आणि स्वभावदर्शनाचें सौंदर्य स्वतंत्रपणे अभिव्यक्त करणें हें काम सोपें नव्हे. परंतु कवि 'उल्हास' यांनीं तें प्रभावीपणानें पार पाडलें आहे हें पाहून समाधान वाटतें..."

**एका सुजनाचा स्वयंस्फूर्त अभिप्राय :**

"या पहिल्या बाजीरावाच्या रूपानें कवि उल्हासानें सांगितलेली कथा वाचतां वाचतां-न चुकतां—कर्तव्यरत व्हावें अशी उत्साहाची लाट उठून गेली. या पहिल्या बाजीरावाच्या रूपानें स्वदेशनिष्ठेचा, शौर्याचा, मनःपूत प्रेमाचा व कर्तव्या-कर्तव्याचा विचार मधुर भाषेत कल्पनेच्या बहारीच्या भरारीनें असा नटवून सांगितला आहे कीं, मन मोहून जातें, डोळे पाणवतात, घडलेला इतिहास समजून, आठवून विचार करायला लागतों."—ग. वि. फडके, ३०४ रास्ता पेठ, पुणें २.

**वाङ्मय शोभा ( पुणें )—**

" हें नाटक नव्या वाचकांना व प्रेक्षकांना आवडेल, नाटक एकंदरींत खूपच यशस्वी झालेलें आहे असें वाटतें. "

**सकाळ ( पुणें )—**

" हें नाटक म्हणजे एक चांगली कलाकृति आहे. "

**साहित्यसहकार ( मुंबई )—**

" मस्तानाची व्यक्तिरेखा हळुवारपणें रेखाटली आहे. ऐतिहासिक नाटकाच्या रंगतीस आवश्यक असे खटकेबाज संवाद लिहिण्यांत लेखक यशस्वी झालेले दिसतात. "

**नवाकाळ ( मुंबई )—**

" बाजीराव व मस्ताना यांचे प्रेमसंबंध इतिहासांत महशूर आहेत. त्याच प्रेमाचें विस्तृत स्वरूप आधुनिकतेचा साज चढवून रंगविण्याचा धाडसी प्रयत्न नाटककारानें ह्या नाटकांत केला आहे. **खुसखुसीत संवाद, विनोद व इतर मनोरंजक प्रसंगांनीं युक्त असें हें नाटक असल्यामुळें वाचकांच्या पसंतीस उतरल्याशिवाय राहात नाहीं.** निजामुन्मुल्क किलिचखानांचा पराभव केल्यानंतरचा प्रसंग वर्णन करून नाटककारानें बाजीराव व मस्ताना यांच्या भेटीच्या प्रसंगालाच हात घातला आहे. पहिल्या अंकांतच त्यांच्यातील शृंगार प्रसंगाचें बहारदार वर्णन वाचकांना व प्रेक्षकांना वाचावयास व पाहावयास मिळतें. मस्तानाच्या अंगप्रत्यंगाचें वर्णन दिलखेंचक शब्दांत केलें आहे. एवढेंच नव्हे तर त्यावर कोटयांची खैरातहि केली आहे इतर अनेक प्रवेशांतून नाटककाराचें हें कौशल्य दिसून येतें व तें वाचत असतां नाटककार गडकऱ्यांच्या नाटकांची आठवण झाल्याशिवाय राहात नाहीं. बाजीराव व मस्ताना यांच्या संबंधाचे दुवे क्रमाक्रमानें जोडून ते उत्कटतेला आणण्याचें कौशल्य नाटककारानें चांगलें साधलें आहे. म्हणून **वाचकांवर व प्रेक्षकांवर नाटकाची शेवटपर्यंत पकड राहूं शकते.** बाजीराव व मस्ताना यांचें दोन तीन प्रवेश तरी शृंगाराची खैरात करणारे आहेत. शृंगारयुक्त प्रवेश जितके परिणामकारक आहेत. तितकाच किंबहुना त्याहून थोडा अधिकच परिणामकारक प्रसंग आहे बाजीराव मृत्युपंथावर

असतांनाचा. बाजीरावाचा मृत्यु व त्यानंतर मस्तानानें केलेलें विषप्राशन हे दोन्ही प्रसंग सदर नाटकांत अतिशय परिणामकारक रीतीनें गुंफण्यांत आले असून तेथेंच नाटक संपतें.

बाजीराव, मस्ताना यांच्याप्रमाणेंच बाजीरावाचा बालमित्र चारण व मस्तानाची सखी सुलताना यांच्याहि प्रेमाचे चाळे वाचकांचें भरपूर मनोरंजन करतात. चारणचें तत्त्वज्ञान तर त्याच्याविषयीं सहानुभूति वाढविण्यास जास्त समर्थ ठरतें. नाटकांतील प्रवेशांची निवड व गुंफण नाटककारानें चांगल्या तऱ्हेनें केली आहे. शृंगाररसपूर्ण, वीररसपूर्ण, करुणरसपूर्ण, हास्यरसपूर्ण असें एकानंतर एक प्रवेश नाटकांत गुंफण्यांत आले आहेत. वाचक नाटकाशीं अधिक समरस होऊं शकतात. प्रत्येक प्रवेशाबरोबर त्यांची जिज्ञासाहि वाढीस लागते...एकंदरींत एका ऐतिहासिक कथानकास आधुनिकतेचा साज देऊन एक उत्तम व मनोरंजक नाटक लिहिण्याचें श्रेय ह्या नाटकामुळें लेखकास लाभलें आहे. "

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वकमा.
अनुक्रम ५३६३७ वि: काव्य
७८३७ बौ: वि: ५३।५७.
REFBK-0015569
REFBK-0015569

---

मुद्रक : दत्तात्रय वासुदेव आंबेकर, आर्यभूषण मुद्रणालय,
९१५/१ शिवाजीनगर, पुणें ४.